सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ

# सार्वजनिक उपक्रम समिति

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१२, ४.१३ व ४.१४ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१२ आणि सन २०११-२०१२ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१ व ३.३ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.९ यावरील समितीचा

# आठवा अहवाल

(दिनांक १२ एप्रिल २०१६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

# सार्वजनिक उपक्रम समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१२, ४.१३ व ४.१४ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१२ आणि सन २०११-२०१२ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१ व ३.३ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.९ यावरील समितीचा

# आठवा अहवाल

## सार्वजनिक उपक्रम समिती

(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**सदस्य**

* २. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

३. श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

४. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

५. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

६. ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.

७. श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.

८. श्री. अमित साटम, वि.स.स.

९. श्री. राजन साळवी, वि.स.स.

१०. श्री. हर्षवर्धन जाधव, वि.स.स.

११. श्री. सुनिल राऊत, वि.स.स.

१२. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

१३. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

१४. ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

१५. श्री. भारत भालके, वि.स.स.

१६. श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.

१७. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स

१८. श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स

१९. श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.

२०. श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

२१. ॲड. अनिल परब, वि.प.स.

२२. श्री. किरण पावसकर, वि.प.स.

२३. श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

२४. आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.

२५. श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

(४) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),

(५) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

* ॲड. राज पुरोहित, वि.स.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर डॉ. अशोक उइके, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजीपासून नियुक्ती करण्यात आली.

## तपशील


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| एक | " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २००८-२००९) | १ |
| | (१) निष्फळ गुंतवणूक (परिच्छेद क्रमांक ४.१२) | |
| | (२) कंत्राटामध्ये अवाजवी अट घातल्याने झालेला खर्च टाळता येण्याजोगा होता (परिच्छेद क्रमांक ४.१३) | |
| | (३) टाळता येण्याजोगे नुकसान (परिच्छेद क्रमांक ४.१४) | |
| दोन | " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २००९-१०) | १९ |
| | (४) मोकळी पडून राहिलेली यंत्रसामुग्री (परिच्छेद क्रमांक ३.१२) | |
| तीन | " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २०११-१२) | २७ |
| | (५) निष्फळ खर्च (परिच्छेद क्रमांक ३.१) | |
| | (६) प्राप्तीकरावर टाळता येऊ शकणाऱ्या व्याजाचे देणे (परिच्छेद क्रमांक ३.३) | |
| चार | " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २०१०-११) | ४१ |
| | (७) टाळता येण्याजोगे अतिरिक्त शुल्क (परिच्छेद क्रमांक ३.९) | |
| पाच | बैठकीचे परिशिष्ट | ४७ |

## प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्र. ४.१२, ४.१३ व ४.१४, महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.१२ आणि सन २०११-२०१२ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१ व ३.३, महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.९ यावरील समितीचा आठवा अहवाल (तेरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

" महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव, श्री. प्र. ग. गणवीर व श्री. स. भा. तामसेकर, तसेच " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचे " सह व्यवस्थापकीय संचालक, श्री. सु. मो. रामचंदानी व उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. राधेश्याम मोपलवार यांची समितीने दिनांक १४ ऑक्टोबर २०१५ व ९ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, श्री. डी. के. जैन, तसेच " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. अरविंद कुमार, यांची समितीने दिनांक ७ ऑक्टोबर,२०१५ व २० जानेवारी,२०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, श्री. उज्वल उके तसेच " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. पंकज कुमार व महाव्यवस्थापक श्री. राकेश बेद यांची समितीने दिनांक २ फेब्रुवारी २०१६ व १७ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार (लेखा III), तसेच श्री.एस.व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखा परिक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव, श्री. प्र. ग. गणवीर व श्री. स. भा. तामसेकर, तसेच " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचे " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. राधेश्याम, मोपलवार सह व्यवस्थापकीय संचालक व श्री.सु. मो. रामचंदानी, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, श्री. डी. के. जैन, तसेच " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. अरविंद कुमार व सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, श्री. उज्वल उके तसेच " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री.पंकज कुमार व महाव्यवस्थापक श्री. राकेश बेद यांनी समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार, दिनांक ५ एप्रिल,२०१६ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ५ एप्रिल २०१६

**डॉ. सुनिल देशमुख**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

## “ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मर्यादित महामंडळ ”

(सन २००८-२००९)

**एक -निष्फळ गुंतवणूक.— (साध्य-असाध्यतेचा अभ्यास (फिझिबिलिटी स्टडी) केल्याशिवाय फूड मॉल बांधल्यामुळे रुपये ५.८० कोटींची गुंतवणूक निष्फळ राहून त्यावर रुपये १.५० कोटी व्याजाचे नुकसान झाले.)**

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-०९ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.१२ मध्ये “ **निष्फळ गुंतवणूक** ” या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने द्रुतगती मार्गाचा वापर करणाऱ्यांच्या आवश्यकतेचा विचार करून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर लोणावळ्याजवळ कुसगांव येथे एकूण रुपये ५.८० कोटी खर्च करून फुडमॉल बांधला (ऑगस्ट,२००६) एकूण ३१५३.०७ चौरस मीटर बांधकाम क्षेत्र असलेल्या फुडमॉलमध्ये वाहन चालकांकरिता उपहारगृह, गाड्या उभ्या करण्यासाठी जागा (पार्किंग), बाग बगीचा इत्यादी गोष्टींचा समावेश होता. सदरहू फुडमॉल बांधल्यापासून (ऑगस्ट, २००६) रिकामा पडला होता. (सप्टेंबर,२००९).

लेखापरीक्षणांत खालील गोष्टी आढळून आल्या :

- फुडमॉल बांधण्यापूर्वी साध्य-असाध्यतेचे अध्ययन केले नाही. द्रुतगती मार्गाकडून राष्ट्रीय महामार्ग ४ कडे जाणाऱ्या उतारावर (रॅम्प) फुडमॉलचे बांधकाम करण्यात आले होते, त्यामुळे त्याचा उपयोग फक्त लोणावळा शहराकडे जाण्याकरिता रस्त्याचा वापर करणाऱ्यांपुरताच मर्यादित राहिला. या शिवाय लोणावळ्यास जाणारे बरेचसे प्रवासी, कुसगांव-जेथे फुडमॉल बांधण्यात आला आहे त्याच्या उतारा आधी येणाऱ्या मुख्य उतारावरुन (मेन रॅम्प) लोणावळा शहरात प्रवेश करतात. त्यामुळे कुसगांवमार्गे जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत आणखी घट झाली. अशा तऱ्हेने फुडमॉलचे स्थान अयोग्य (इनॲपरोप्रिएट) होते. परिणामत: सदरहू फुडमॉल भाडेकराराने देण्यासाठी फेब्रुवारी, सप्टेंबर आणि डिसेंबर,२००७ मध्ये निविदा आमंत्रित करून सुद्धा कोणाकडूनही त्यास प्रतिसाद मिळाला नाही. याची मुख्य कारणे सरळ प्रवेश मार्ग नसणे (डायरेक्ट ॲक्सेस) व द्रुतगती मार्गावरुन फुडमॉल दिसण्यात येणारी अडचण ही होती.

• साध्य-असाध्यतेचा अभ्यास केल्याशिवाय फुडमॉल बांधल्याने आणि तद्नंतर तो भाडेकराराने देण्यात मिळालेल्या प्रतिसादाचा अभाव यामुळे रुपये ५.८० कोटींची गुंतवणूक निष्फळ तर झालीच शिवाय रुपये १.५० कोटी * व्याजाचे पण नुकसान झाले (सप्टेंबर,२००६ ते मार्च,२००९).

*** रुपये ५.८० कोटी x १० टक्के (बॉन्डवर देण्यात येत असलेला व्याजदर) x ३१ महिने (सप्टेंबर, २००६ ते मार्च, २००९)**

व्यवस्थापनाने उत्तरात सांगितले की (मे,२००९) कुसगावला बांधलेल्या फुडमॉलला द्रुतगती मार्ग तसेच राष्ट्रीय महामार्ग चार- या दोन्ही बाजूंनी प्रवेश होता. उत्तरामध्ये द्रुतगती मार्गावरून फुडमॉलकडे सरळ रस्त्याचा मुद्दा व मॉलच्या बांधकामापूर्वी साध्य-असाध्यतेचा अभ्यास न करण्याच्या कारणांचा काहीच उल्लेख नाही. तीन वर्षापेक्षा (सप्टेंबर,२००९) अधिक काळ लोटूनदेखील कंपनी फुडमॉल भाडयाने देऊ शकली नाही. यावरून फुडमॉल अयोग्य ठिकाणी बांधल्याच्या लेखापरिक्षणातील निरीक्षणास दुजोराच मिळतो.

शिफारस करण्यात येते की, अशा प्रकारच्या सुखसोयी पुरविण्याकरिता निर्णय घेतेवेळी एखाद्या गोष्टीची आवश्यकता आहे की नाही याचा अभ्यास करणारी, आर्थिक व्यवहार्यता आणि तांत्रिक-वाणिज्यिक बाबींचा विशिष्ट स्थानाची निवड करताना विचार करणारी पद्धती विकसित करावयास हवी.

शासनास हे प्रकरण कळविण्यात आले होते. (मार्च,२००९) परंतु त्यांच्याकडून उत्तर मिळावयाचे बाकी होते (डिसेंबर,२००९).

**१.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा वापर करणाऱ्या प्रवाशांसाठी द्रुतगती मार्गाच्या दोन्ही बाजूंस सोयी-सुविधांसाठीचे बांधकाम करण्याचे काम संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर महामंडळाने हाती घेतले. पुण्याकडे जाणाऱ्या तसेच मुंबईकडे येणाऱ्या रस्त्यालगत काही ठिकाणी फुडमॉल उभारण्याची मागणी प्रवाशांकडून सातत्याने करण्यात येत होती. त्यास अनुसरून फुडमॉल व पेट्रोल पंपासाठीच्या संभाव्य ठिकाणांचा विचार करण्यात आला. या योजनेनुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पुण्याकडील बाजूस तीन व मुंबईकडील बाजूस दोन ठिकाणी फुडमॉल्स उभारली. या उभारण्यात आलेल्या ५ ठिकाणांपैकी ४ ठिकाणांचे फुडमॉल्स सुरू आहेत. त्यावरून महामंडळाची संकल्पना आणि योजना योग्य असल्याचे दिसून येते. मुख्य द्रुतगती मार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग ४ वर अत्यावश्यक अशा सहाय्यभूत सेवा आहेत. अशा तऱ्हेच्या फुडमॉल्सच्या योजना इतर ठिकाणी याआधी यशस्वी ठरल्या आहेत.

महामंडळाकडून राष्ट्रीय महामार्ग ४ चा करण्यात येणारा विकास नजरेसमोर ठेवूनच फुडमॉलसाठीचे हे ठिकाण निश्चित करण्यात आले होते. राष्ट्रीय महामार्ग ४ वर महामंडळाने एकही फुडमॉल उभारलेला नाही, कारण कुसगाव येथील ठिकाण, द्रुतगती मार्ग व राष्ट्रीय महामार्ग ४ ला जोडले गेले असल्याने आणि द्रुतगती मार्गाच्या दोन्ही बाजूंनी मिळणारे असल्याने फुडमॉलसाठी सुयोग्य असे ठिकाण ठरेल व त्यामुळेच या ठिकाणी तो उभारण्याचे महामंडळाने ठरविले.

आता बांधकाम पूर्ण झाले असून फुडमॉल चालविण्यासाठी चालक नेमण्याची कार्यवाही सुरू आहे. बांधकामावर झालेला खर्च रु. ५.८० कोटी इतका आहे. मात्र त्याच्या देखभालीवर आतापर्यंत कोणताही खर्च झालेला नाही. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा फुडमॉल भाडेपट्ट्यावर देण्याबाबतची कार्यवाही सुरू केली असून त्याद्वारे उत्पन्नाचा स्त्रोत लवकरच सुरू होईल. हे विचारात घेता करण्यात आलेला खर्च वाया गेला असे म्हणता येणार नाही.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा फुडमॉल भाडेतत्त्वावर देण्याचा कायमच प्रयत्न केला आहे. तो चालविण्यासाठी ठेकेदार नेमण्यासाठीचे देकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मागविले होते आणि ते दिनांक २९ ऑक्टोबर, २००९ रोजीपर्यंत सादर करावयाचे होते. असे देकार प्राप्त झाले मात्र ते सदोष असल्याने नाकारण्यात आले. त्यानंतर पुन्हा देकार मागविण्यात आले मात्र त्यास प्रतिसाद मिळाला नाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आणखी एकदा देकार मागवून ही मालमत्ता उपयोगात आणणार आहे.

लेखापरीक्षणामध्ये करण्यात आलेल्या शिफारशींची दखल घेण्यात आली आहे. महामंडळाने या मालमत्तेसाठी नेमलेल्या ख्यातनाम सल्लागारांकडून प्राप्त झालेल्या अहवालातील शिफारशीप्रमाणे योजना कार्यान्वित केली आहे.

वर नमूद केलेली वस्तुस्थिती आणि स्पष्टीकरण विचारात घेऊन हा परिच्छेद वगळण्यात यावा.

१.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाने सादर केलेले स्पष्टीकरण वस्तुस्थितीवर आधारित असल्याने शासन स्तरावर कार्यवाहीची आवश्यकता नाही.

१.४ तद्नंतर याप्रकरणी समितीला सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सह व्यवस्थापकीय संचालक, व इतर अधिकारी

यांची दिनांक १४ ऑक्टोबर २०१५ व ९ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ४.१२ मध्ये " निष्फळ गुंतवणूक "** या आक्षेपासंदर्भात मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर लोणावळ्याजवळ असलेला कुसगांव फुडमॉल सन २००८-२००९ पासून वापराविना पडलेला आहे. या फुडमॉलचे बांधकाम करण्यासाठी महामंडळाने ५.८० कोटी रुपये खर्च केले आहेत. या फुडमॉल संदर्भात काय कारवाई करण्यात आली अशी समितीने विचारणा केली.

त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी हा फुडमॉल भाड्याने चालविण्यासाठी द्यावा यासाठी १५ वर्ष कालावधीचे टेंडर काढण्यात आले होते. त्यावेळी ४ कोटी २३ लाख रुपयांचे टेंडर आले होते. त्यामुळे प्रतिवर्षाचा भाड्याचा हिशोब केला तर जवळपास २८ लाख रुपये भाडे एका वर्षासाठी मिळणार होते, त्यामुळे ते टेंडर रद्द करण्यात आले होते. त्यानंतर जमिनीची हद्द निश्चित करण्यात आली आहे असा समितीसमोर खुलासा केला त्यावर समितीने विचारले की, समितीने फुडमॉलला भेट दिली तेव्हा महामंडळाच्या अधिकाऱ्यांना फुडमॉलची एकूण जागा किती एकर आहे व ती कोठून कोठपर्यंत आहे हे न सांगता फक्त त्यांनी तीन एकर जागा असल्याचे सांगितले होते, जागेची सिमा निश्चित करण्यात आलेली नव्हती. त्या ठिकाणी अत्यंत अस्वच्छता होती. या फुडमॉलच्या संदर्भात अधिकारी अत्यंत बेफिकीर आहेत, मोक्याच्या जागेवर फुडमॉल असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे काय, असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहे.

या समितीच्या आक्षेपावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, फुडमॉल व तेथील जागेच्या संदर्भात निश्चितपणे संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी होती. अधिकाऱ्यांचे या फुडमॉलकडे निश्चितच दुर्लक्ष झालेले आहे. त्यावेळी जागा निश्चित करण्यात आलेली नसल्यामुळे अधिकाऱ्यांना नक्की जागा कोठून कोठपर्यंत आहे याची माहिती नव्हती. फुडमॉलच्या जमिनीच्या संदर्भात जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची बदली करण्यात आलेली आहे असा खुलासा केला याबाबत समितीने असे स्पष्ट केले की, चूक मान्य करुन हा प्रश्न सुटणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभागातील कोणते अधिकारी यासाठी जबाबदार होते. त्यांनी त्यांची जबाबदारी का पार पाडली नाही. त्यांची नावे समितीला सादर करण्यात यावीत. तसेच या फुडमॉलचे बांधकाम करण्यासाठी महामंडळाने ५.८० कोटी रुपये खर्च केले असून हा फुडमॉल वापराविना पडून आहे ही बाब योग्य नाही. याबाबत वेळीच योग्य नियोजन करण्यात आले नाही. असेही समितीने मत व्यक्त केले.

१.५ **अभिप्राय व शिफारस :—**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखा परीक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ४.१२ निष्फळ गुंतवणूक (साध्य-असाध्यतेचा अभ्यास (फिझिबिलिटी स्टडी) केल्याशिवाय फुड मॉल बांधल्यामुळे रुपये ५.८० कोटींची गुंतवणूक निष्फळ राहून त्यावर रुपये १.५० कोटी व्याजाचे नुकसान झाले)** या शीर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, **मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर लोणावळ्याजवळ कुसगाव येथे एकूण रुपये ५.८० कोटी खर्च करून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) बांधलेला फुडमॉल जागेचा साध्य-असाध्यतेचा अभ्यास न करता बांधल्यामुळे भाडे कराराने देण्यात प्रतिसाद मिळत नसल्याने रुपये ५.८० कोटींची गुंतवणूक निष्फळ होऊन रुपये १.५० कोटी व्याजाचे देखील नुकसान झाल्याचे समितीस दिसून येते** तसेच समितीने कुसगांव फुडमॉलला दिनांक २७ ऑक्टोबर २०१५ रोजी भेट दिली असता सदर फुडमॉल व भूखंड भाडेतत्वावर देण्यासाठी यापूर्वी अटी व शर्ती तसेच भाडेपट्ट्याचा कालावधी यामध्ये बदल करून ९ **वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे निविदा रद्द करण्यात आल्या उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता महामंडळाने कुसगाव फुडमॉल कोणतेही नियोजन न करता बांधल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे.**

**याप्रकरणी ज्या अधिकाऱ्यांच्या गलथानपणामुळे फुडमॉलसाठी योग्य जागेची निवड केली गेली नाही त्यामुळे महामंडळाचे आर्थिक नुकसान झाले. याबाबत जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची चौकशी करून त्यात दोषी असतील त्यांच्याविरुद्ध जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा तसेच समितीच्या असेही निदर्शनास आले की, राष्ट्रीय महामार्ग क्र.४ व द्रुतगती मार्गावरील वाहनांकरिता तसेच सदर फुडमॉलमध्ये येण्या-जाण्यासाठी रस्ता नाही तेथे स्वच्छतेचा अभाव असून प्रवाशांना थांबण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. तथापि, सदर फुडमॉलचा विनियोग फुडमॉल म्हणून भाडेतत्वावर देण्यास प्रतिसाद मिळत नसल्यास त्याचा उपयोग मंगल कार्यालय (Function Hall) किंवा रिसॉर्टसाठी होऊ शकेल यादृष्टीने महामंडळाने तातडीने चाचपणी करावी व फुडमॉल बंद अवस्थेत न ठेवता तो लवकरात लवकर वापरात आणावा जेणेकरून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे होणारे आर्थिक नुकसान टाळता येऊ शकेल, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**दोन-कंत्राटामध्ये अवाजवी अट घातल्याने झालेला खर्च टाळता येण्याजोगा होता :— (जमीन प्रत्यक्ष ताब्यात असल्याची खातरजमा केल्याशिवाय कंत्राट दिल्याने रुपये १.८९ कोटीचा टाळता येण्याजोगा खर्च झाला).**

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-०९ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.१३ मध्ये **"कंत्राटामध्ये अवाजवी अट घातल्याने झालेला खर्च टाळता येण्याजोगा होता"** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते. बांधकामाशी संबंधित कंत्राटांचे काटेकोर नियोजन करताना कंत्राट देण्यापूर्वी बांधकाम सुरू करण्यास अत्यावश्यक असलेल्या-जसे वादमुक्त जमिनीची उपलब्धता इत्यादी गोष्टींचा प्राधान्याने विचार करावा लागतो.

कंपनीने सिन्नर-घोटी मार्गावर ५३ किलोमीटरच्या रस्ते सुधारणा व एक रेल्वे ओव्हरब्रिज बांधण्याचे काम "रे कन्स्ट्रक्शन्स मुंबई" (कंत्राटदार) यांना दिले (नोव्हेंबर,२०००) कंत्राटाची रक्कम रुपये ३६.२९ कोटी व २४ महिन्यांची मुदत होती. कंत्राटातील एका अटीप्रमाणे कामास ताबडतोब प्रारंभ करण्याच्या दृष्टीने काम सुरू करण्याची नोटीस दिल्यापासून (१६ नोव्हेंबर,२०००) १४ दिवसांच्या आत ४४ किलोमीटर जमिनीचा व उरलेल्या नऊ किलोमीटर जमिनीचा ताबा सहा महिन्यानंतर द्यावयाचा होता. वादमुक्त जमीन उपलब्ध नसल्याने कंत्राटातील अटीप्रमाणे विशिष्ट कालावधीत ४४ किलोमीटर जमिनीचा ताबा कंपनी कंत्राटदारास देऊ शकली नाही. कंत्राटदाराला नोव्हेंबर,२००१ ते मार्च,२००४ या कालावधीत तुकड्या तुकड्याने (स्ट्रेचेस) जमिनीचा ताबा देण्यात आला. यामध्ये बराच उशीर झाला (१२ ते ३९ महिने) परिणामतः काम कंत्राटात नमूद केलेल्या कालावधीपेक्षा ४ वर्षापेक्षा जास्त वेळाने रुपये ४१.२२ कोटीचा ज्यामध्ये अतिरिक्त काम/कामाच्या जादा मात्रेचा समावेश होता - खर्च होऊन पूर्ण झाले (डिसेंबर, २००६).

जमीन ताब्यात देण्यास विलंब झाल्याच्या कारणावरुन कंत्राटदाराने मशिनरी रिकामी पडून राहणे (आयडल), मोबिलायझेशन ॲडव्हान्स वरील व्याज इ. करिता रुपये ११.७९ कोटीचा दावा केला (जुलै,२००४) प्रारंभी कंपनीने कंत्राटदाराची मागणी फेटाळून (एप्रिल,२००७) लावली होती परंतु नंतर कंपनीच्या सुकाणू समितीने (स्टिअरींग कमिटी) कंत्राटदाराला जागा ताब्यात देण्यास विलंब झाल्याने मशिनरी रिकामी पडून राहाणे, बँक गॅरंटीचा कालावधी वाढवावा लागणे इत्यादीमुळे झालेल्या नुकसानीपोटी रुपये १.८९ कोटी देण्यास मान्यता दिली (सप्टेंबर,२००७).

लेखापरीक्षणात आढळून आले की काम सुरू करण्याची नोटीस दिल्यापासून चौदा दिवसांच्या आत शक्य-अशक्यता (फिझीबिलीटी) न अजमाविता ४४ किलोमीटर जमीन कंत्राटदाराच्या ताब्यात देण्याची अट करारात समाविष्ट करणे व्यवस्थापनाच्या अयोग्य नियोजनाचे द्योतक आहे. अशाप्रकारे जमीन ताब्यात असल्याची खातरजमा न करताच काम सुरू करण्यासाठी कंत्राट दिल्यामुळे नुकसान भरपाईपोटी कंत्राटदारास रुपये १.८९ कोटी द्यावे लागले.

शासन तसेच व्यवस्थापनाने जमीन अधिग्रहण करण्यास उशीर झाल्याने व कंत्राटदारानुसार जमिनीचा ताबा देऊ न शकल्याचे मान्य केले (नोव्हेंबर,२००९) शिफारस करण्यात येते की, वादमुक्त जमीन व अन्य अनिवार्य सुविधा उपलब्ध असल्यावरच कंत्राट द्यावयास हवे. सुरूवातीच्या नियोजन प्रक्रियेत अन्य सरकारी संस्थांशी समन्वय स्थापित करावयास हवा. कंपनीमध्ये जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा उभारण्यात यावी जेणेकरून बांधकाम करावयाच्या जमिनीसंदर्भात (साईट) अवास्तव दावे केल्यास त्याविषयी जबाबदारी निश्चित करता येईल.

२.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, मुंबई-औरंगाबाद-नागपूर हा रस्ता राज्यातील महत्त्वाच्या औद्योगिक शहरांना कमीत कमी अंतराने जोडणारा महामार्ग व राज्याच्या आर्थिक विकासासाठी पूरक ठरणारा असल्याने नागपुर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी-मुंबई हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग दर्जानुसार विकसित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक २३ डिसेंबर १९९९ च्या बैठकीत घेण्यात आला. नागपूर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी या रस्त्याची अंदाजे लांबी ७००.०० कि.मी. आहे आणि कामाच्या सुसाध्यतेसाठी या कामाची एकूण १९ विभागांत विभागणी केली आहे, यापैकी भाग क्रमांक १८ हा सिन्नर-घोटी रस्ता आहे. घोटी-सिन्नर हा मार्ग मुंबईहून शिर्डीकडे जाण्याकरिता कमी अंतराचा मार्ग असल्यामुळे तो लवकरात लवकर होणे आवश्यक होते. सदरील ५४ कि.मी.चे काम लवकर होणे आवश्यक होते. तसेच भूसंपादन प्रक्रियेकरिता सारखा पाठपुरावा सुरू होता. परंतु भूसंपादन प्रक्रिया अतिशय क्लीष्ट व वेळ घेणारी होती. तसेच भूधारकांचा विरोध इत्यादी अनेक अडचणीस सामोरे जावे लागले. त्यावेळेस भूसंपादनाकरिता लागणारा वेळ अपेक्षित नसावा. कामाची निविदा निश्चित करणे त्याचबरोबर तांत्रिक सल्लागार यांची निविदा एकत्रितपणे निश्चित करावी लागते. त्याच्या निविदा निश्चित करण्याचा कालावधी १२० दिवस असतो या कालावधीत निविदा मंजूर करून कार्यारंभ आदेश द्यावे लागतात.

तसेच जमीन मालकांनी सदरील जागा १४ दिवसांत ताब्यात देण्याबाबत तोंडी संमती दर्शविली होती परंतु जागा मालकांच्या आपसातील हिस्सेदार व इतर वादामुळे जागा मिळण्यास उशीर झाला. वरील बाबींमुळे निविदेत १४ दिवसांत जमीन उपलब्ध करून दिली जाईल अशी अट टाकण्यात आली होती. कारण भूसंपादन, दोन्ही कार्यारंभ आदेश नियमानुसार देणे याचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला होता. तसेच कंत्राटदारास जमीन उपलब्ध असल्याची हमी दिल्याशिवाय कंत्राटदार निविदा सादर करणे व इतर अटी, मुद्दे उपस्थित करून निविदा प्रक्रियेस वेळ लागला असता आणि उर्वरित उपलब्ध जागेत काम सुरू करता आले नसते अशी त्यावेळेस धारणा होती, म्हणून शिबिर कार्यालय नाशिक/औरंगाबाद यांनी निविदेत वरीलप्रमाणे अट टाकली असावी आणि त्यास महामंडळाचे मुख्य कार्यालय, मुंबई येथे तपासणी करून निविदेस मान्यता प्रदान करण्यात आली.

जर का संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश द्यावयाचा झाला असता तर ४-५ वर्षांनंतर सर्व निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे करावी लागली असती. त्याचा खर्च निश्चितपणे जास्त आला असता व वाहतूकदारांचा रस्त्याचा उपयोग ४/५ वर्षांनंतर करावा लागला असता. भूसंपादनाबाबत सिन्नर-घोटी या लांबीत संपादित केलेल्या जमिनीसाठी अतिरिक्त दर/भूभाडे इत्यादीबाबतची प्रकरणे न्यायालयात अजूनही सुरूच आहेत, त्यामुळे भूसंपादना अभावी रस्त्याच्या बांधकामाच्या सर्व प्रक्रियेस सुरूवात न करणे योग्य नव्हते. वरील कामाचे कार्यारंभ आदेश सदरील अट टाकून केल्यामुळे ठेकेदारास जशी जशी जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे त्वरित काम करून घेण्यात आले म्हणून प्रकल्पातील कामे पूर्ण करून दिनांक २५ जून, २००७ रोजी पासून या मार्गावर पथकर आकारणी सुरू करण्यात आली. या पथकर आकारणीद्वारे एकूण रु. ५.९८ कोटी महामंडळास मिळाले आहेत. तसेच भूसंपादनाअभावी कामाचे आदेश चार-पाच वर्षानंतर दिले असते तर नवीन दराने निविदा मागवून काम करावे लागले असते, त्यामुळे दरवाढीमुळे अंदाजे रु. ३.६२ कोटी जास्त खर्च आला असता. असा एकंदरीत महामंडळाला (रु.५.९८ + रु. ३.६२ = रु. ९.६०) - रु.१.८९ = रु.७.७१ कोटीचा फायदा झालेला आहे.

वरील सर्व बाबीवरुन असे दिसते की, महामंडळाने काम लवकरात लवकर होण्याकरिता भूसंपादनाची अट निविदापत्रात टाकली होती, त्यामुळे सर्व बाबींचा व वेळेचा विचार करता रु. १.८९ कोटी जास्त खर्च सोसूनसुद्धा नंतर होणाऱ्या खर्चाचा विचार करता सदरील निविदेत समाविष्ट केलेली अट ही फायदेशीर बाब ठरलेली आहे.

तरी सदरील परिच्छेद क्र. ४.१३ हा बंद करण्याची विनंती आहे.

२.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे कार्यारंभ आदेश देण्यापर्यंत ४४ कि.मी. लांबीमधील जागा उपलब्ध नव्हती, त्यामुळे निविदेत कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कंत्राटदारास १४ दिवसांच्या आत ४४ कि.मी. लांबीतील जागा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी टाकलेली अट ही निश्चित अवास्तव व अव्यवहार्य होती. परिणामतः निविदेतील अटीप्रमाणे जागा उपलब्ध करून देण्यात विलंब झाल्यामुळे उद्योजकास रुपये १.८९ कोटी इतकी नुकसानभरपाई द्यावी लागलेली आहे, त्यामुळे महामंडळाच्या खुलाशाशी विभाग संपूर्णतः सहमत नाही. मात्र भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच ४-५ वर्षांनंतर निविदा मागविल्या असत्या तर प्रकल्पाच्या किंमतीत निश्चित वाढ झाली असती.

२.४ तद्नंतर याप्रकरणी समितीला सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक १४ ऑक्टोबर २०१५ व ९ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ४.१३ मध्ये "कंत्राटामध्ये अवाजवी अट घातल्याने झालेला खर्च टाळता येण्याजोगा होता"** या आक्षेपासंदर्भात सिन्नर-घोटी मार्गावरील ४४ किलोमीटरच्या रस्त्यासाठी जमीन उपलब्ध नसताना देखील १४ दिवसात कंत्राटदारास जागा उपलब्ध करुन देण्यात येईल अशी अट निविदेमध्ये का अंतर्भूत केली गेली अशी समितीने विचारणा केली.

त्यानुषंगाने खुलासा करताना महामंडळाच्या प्रतिनिधींनी नागपूर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी मार्गावर ५३ किलोमीटर रस्त्याचे काम देताना जी जमीन आहे ती १४ दिवसांच्या आत देऊ, बाकीची जमीन नंतर देऊ ही अट टाकली होती. ही अट टाकली असताना महामंडळाचा जो मुख्य उद्देश होता की, फक्त राष्ट्रीय महामार्ग विकसित करावयाचे होते. त्यामुळे नवीन हरित पट्टा प्रकल्प नव्हता. राष्ट्रीय महामार्गाचे फक्त रस्ता रुंदीकरण करायचे होते. साडेपाच मीटरचा रस्ता असेल. तर त्याला ७ मीटर करावयाचा होता. ती जमीन शासनाची होती. ती महामंडळाला उपलब्ध होईल असे गृहीत धरुन ही अट घातली होती. रस्ता सुधारणा व एक रेल्वे ओव्हरब्रिज बांधण्याचे काम सन २००० मध्ये निविदा काढून "रे कन्स्ट्रक्शन, मुंबई" यांना दिले होते. कंत्राटाची रक्कम ३६.२९ कोटी रुपये होती असे समितीस स्पष्ट केले.

यासंकरणी सात टक्के कमी दराने निविदा आल्यामुळे, ती रक्कम ३३.७५ कोटी इतकी झाली होती. सदर काम दोन वर्षात पूर्ण करावयाचे होते. या रस्त्याच्या कामासाठी जास्तीत जास्त जमीन संपादित करण्यात आलेली होती. हा रस्ता ओडीआर, एमडीआर व स्टेट हायवे यामध्ये विभागण्यात आला होता. या रस्त्याचे ३८ ते ४२ भाग केले होते. या कामाची मुदत सन २००२ मध्ये संपली होती. त्यानंतर सन २००८ मध्ये ही कामे पूर्ण झाली आहेत. या कामामध्ये १.८९ कोटी रुपयांचे नुकसान झाले. ८० टक्के जमीन संपादित करण्यात आलेली होती व त्यावर काम सुरू करण्यात आले होते. उर्वरित जमीन, जमीन मालकांनी १४ दिवसांत ताब्यात देण्याबाबत तोंडी संमती दर्शविली होती. परंतु जागा मालकांच्या आपसातील हिस्सेदार व इतर वादामुळे उशीर झालेला आहे. ४९ किलोमीटरच्या रस्त्यापैकी ४४ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. ५ किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी विलंब झालेला आहे, या कामामुळे १.८९ कोटी रुपयांचे नुकसान झाले असा आक्षेप आहे, परंतु यापूर्वी निविदा काढण्यात आलेली असल्यामुळे सदर कामावर खर्च कमी झालेला आहे. या रस्त्याच्या कामाच्या संदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन मुंबई-नागपूर हा हायवे लवकरात लवकर व्हावा असा उद्देश होता.

याबाबत समितीने पुढे अशी विचारणा केली की, निविदेमध्ये जी जमीन आहे ती १४ दिवसांच्या आत देवू बाकी जमीन नंतर देवू ही अट टाकल्यामुळे कंत्राटदाराला नुकसान भरपाई द्यावी लागली. परंतु ही अट टाकण्याची काय गरज होती, याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी, महामंडळाचा विश्वास एवढाच होता, हा पूर्वीचा अस्तित्वात असलेला रस्ता आहे. याच्यामध्ये काम करताना काहीही अडचण येणार नाही. नवीन प्रकल्पामध्ये अशी अट टाकता येत नाही. परंतु पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यामुळे ही अट टाकली तसे काम कुठेही अडणार नाही असे गृहीत धरुन त्यांनी अट टाकली आहे. जर निविदेमध्ये आपण जमीन उपलब्ध करण्याबाबत विश्वास दाखविला नसता व कोणतेही काम अडणार नाही असे नाही असे आपण त्यांच्यावर विश्वास दाखविला नसता तर त्यांनी वेगळा दर कोट केला असता. नोव्हेंबर, २००० चे काम करून पथकर गोळा करणे. सन २००७ मध्ये सुरू झाले असा खुलासा केला यानुषंगाने समितीने हे काम किती दिवसात करायला पाहिजे. ते काम ५ वर्षे उशीराने झाले आहे त्याचे कारण काय, अशी विचारणा केली त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, २० महिन्यात करायला पाहिजे. टोलचे काम जुलै, २००७ ला पूर्ण झाले. काम उशिरा पूर्ण झाले. त्यामध्ये जो उशीर झालेला आहे त्याची कारणे वेगवेगळी आहेत. काही लोकांचे जागा मालकांच्या आपसातील हिस्सेदार व इतर वादामुळे जागा मिळण्यास उशीर झाला.

त्यावर समितीने भविष्यात यांनी किती टक्के जमीन संपादित केल्यानंतर निविदा काढाव्यात यासंदर्भात महामंडळाने यंत्रणा विकसित करावी. याप्रकरणी कोण जबाबदार आहे. अशी विचारणा करून हा रस्ता अस्तित्वात असलेला रस्ता असून रुंदीकरण करण्याचे काम असल्याने ते काम करु शकलो असा विश्वास होता. या पुढच्या निविदेमध्ये अशी अट टाकू नये, अशी सुधारणा करण्यात येईल आणि याला कोण जबाबदार आहे याचे स्पष्टीकरण रस्ते विकास महामंडळाकडून मागवतो. त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल असा विभागिय सचिवाने समितीसमोर खुलासा केला.

**२.५ अभिप्राय व शिफारस :— महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सिन्नर-घोटी मार्गावर ५३ कि.मी. रस्ते सुधारणा व एक रेल्वे ओव्हरब्रिज बांधण्याचे काम "रे कन्स्ट्रक्शन" मुंबई यांना नोव्हेंबर,२००० मध्ये दिले या कंत्राटातील एका अटीप्रमाणे कामास तावडतोब प्रारंभ करण्यासाठी नोटीस दिल्यापासून १४ दिवसांच्या आत ४४ कि.मी. जमिनीचा व उरलेल्या ९ कि.मी. जमिनीचा ताबा ६ महिन्यांनंतर द्यावयाचा होता तथापि कंत्राटातील अटीप्रमाणे ४४ कि.मी. रस्त्यासाठी जमिनीचा ताबा महामंडळ कंत्राटदारास देऊ शकले नाही. त्यामुळे झालेल्या विलंबास्तव कंत्राटदारास मशिनरी रिकामी पडून राहणे, सुसज्जता अग्रीम (Mobilisation Advance) वरील व्याज इ. करिता नुकसानीपोटी रु. १.८९ कोटी रक्कम देण्यात आली. त्यामुळे सदर अवाजवी अट कोणत्या अधिकाऱ्याने कंत्राटामध्ये समाविष्ट केली व त्या अधिकाऱ्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे याबाबतची माहिती समितीस अवगत करण्यात यावी.**

तसेच यापुढे महामंडळाने कोणत्याही निविदा मागविण्यापूर्वी तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करून व साध्य-असाध्यता तपासून निविदा निर्गमित करण्यात याव्यात. शासनाने निविदांबाबत सर्व समावेशक निश्चित स्वरुपाचे धोरण आखावे तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने एखाद्या कामाविषयीचे कंत्राट दिल्यास ते संपूर्ण काम विहित कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात यावी, उपरोक्त प्रकरणी महामंडळाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

**तीन-टाळता येण्याजोगे नुकसान.—(टोल वसुलीतून प्रकल्पाचा खर्च वसूल न झाल्यामुळे कंपनीस रुपये १.६९ कोटींचे नुकसान सोसावे लागले).**

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-०९ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.१४ मध्ये " **टाळता येण्याजोगे नुकसान** " या संदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले होते की, कंपनी महाराष्ट्र शासनाकरिता बांधा, वापरा आणि हस्तांतर करा (बीओटी) तत्वावर रस्ते व पूल बांधते. प्रकल्पावर व्याजासहित होणारा खर्च महाराष्ट्र शासनाकडून ठरविलेल्या कालावधीत नागरिकांकडून टोलच्याद्वारे वसूल करण्यात येतो. कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावाच्या आधारे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून (पी.डब्ल्यु.डी.) टोलच्या आकारणीविषयी अधिसूचना (नोटीफिकेशन) जारी करण्यात येते.

कंपनीने जून,२००० मध्ये रोटेगांव, जिल्हा औरंगाबाद या ठिकाणी रुपये ४.२१ कोटी खर्चून रेल ओव्हर ब्रीज (आरओबी) बांधला, कंपनीने तयार केलेल्या रोकड प्रवाह विवरणानुसार (कॅश फ्लो स्टेटमेंट) प्रकल्पावर केलेला खर्च २००७ पर्यंत वसूल होण्याची अपेक्षा होती. त्यानुसार कंपनीने एप्रिल,२००० मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागास (पी.डब्ल्यू.डी.स) रोटेगांव येथे डिसेंबर,२००७ पर्यंत टोलवसुलीस परवानगी देणारी अधिसूचना जारी करण्याची विनंती केली. परंतु पी.डब्ल्यू.डी.ने २० सप्टेंबर,२००० ते १९ सप्टेंबर,२००३ या कालावधीपुरतीच टोल वसुली संबंधातील जाहीर सूचना काढली (सप्टेंबर,२०००) ऑगस्ट,२०१३ मध्ये कंपनीने वाहनांच्या वर्दळीत (ट्रॅफिक) घट झाल्याने टोल वसुलीत पण घट झाल्याचे कारण सांगत पी.डब्ल्यू.डी.स टोल आकारणीचा कालावधी २०११ पर्यंत वाढविण्यासंबंधी नवीन प्रस्ताव सादर केला. परंतु पी.डब्ल्यू.डी. ने टोल वसूल करण्यास फक्त डिसेंबर,२००५ पर्यंत परवानगी दिली व त्यामुळे होणारे नुकसान कंपनीचा टोल महसुलाचा अंदाज चुकीचा ठरल्याचे सांगून सहन करण्यास सांगितले.

या संबंधात लेखापरिक्षणात खालील गोष्टी आढळून आल्या :—

• कंपनीने एप्रिल,२००० मध्ये २००१ व २००२ या वर्षात वसूल होणाऱ्या अंदाजित रुपये १.८१ कोटी व रुपये १.९० कोटी टोलच्या तुलनेत या दोन्ही वर्षात प्रत्यक्षात वसूल झालेल्या टोलची रक्कम अनुक्रमे रुपये ८०.४२ लाख व रुपये १.०९ कोटी होती. ही वसुली अंदाजित टोल वसुलीच्या केवळ ५६ आणि ४३ टक्केच होती. यावरुन कंपनीची टोलवसुली महसूल अंदाज पद्धती दोषयुक्त असल्याचे दिसून येते.

* कंपनीने व्याज हिशोबात धरुन एकूण रुपये ७.२३ कोटी प्रकल्पावर खर्च केले (मार्च,२००६) परंतु सप्टेंबर,२००० ते डिसेंबर,२००५ या काळात टोलद्वारे रुपये ५.५४ कोटीच वसूल होऊ शकले. प्रकल्प खर्च व त्यापासून टोलद्वारे मिळालेल्या उत्पन्नात रुपये १.६९ कोटीची तफावत राहिली. या रुपये १.६९ कोटी तफावतीमुळे एप्रिल, २००६ ते मार्च, २००९ या कालावधीकरिता कंपनीने रोकड प्रवाह विवरणांत गृहीत धरलेल्या १८ टक्के दराने रुपये ९१.२६ लाख रुपये * व्याजाचे पण नुकसान झाले.

* प्रकल्पावर खर्च केलेल्या रकमेची टोलमधून वसुली हे बीओटीच्या अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे प्रकल्पावर केलेला खर्च टोलद्वारा वसूल करु न देण्याचा पी.डब्ल्यु.डी./शासन यांचा निर्णय पायाभूत प्रकल्पांची बीओटी तत्वानुसार उभारणी करण्याच्या तत्वाविरुद्ध आहे.

कंपनीने झालेल्या नुकसानाचे समर्थन करतांना (मे, २००८) असा युक्तीवाद केला की टोल वसुलीच्या संदर्भात व्यक्त केलेला अंदाज पुर्वानुमानाच्या (फोरकास्ट) स्वरुपाचा होता जो प्रत्यक्षात खरा ठरेलच असे नाही. कंपनीने असे पण सांगितले की अपेक्षित महसूल व प्रत्यक्षात जमा झालेला वसुल यातील तफावत वाहनांच्या वर्दळीत (ट्रॅफिक) घट झाल्याने व वरचेवर ये जा करणाऱ्यांना दिलेल्या सवलतीमुळे निर्माण झाली. कंपनीने असे पण सांगितले की ते सरकारकडून झालेले नुकसान वसूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. कंपनीने दिलेले उत्तर समर्थनीय नाही. कारण वास्तविक टोल वसुली व अंदाजित टोल वसुली यात भरपूर तफावत आहे तसेच नेहमी ये जा करणाऱ्यांना टोलपासून माफी या गोष्टींचा विसर, यावरुन चुकीची अनुमान पद्धती वापरल्याने रुपये १.६९ कोटीचे नुकसान झाले. न राज्य सरकारने झालेले नुकसान आजपावेतो भरुन दिले (जुलै,२००९) न कंपनीने त्याचा पाठपुरावा चालू ठेवला (ऑगस्ट,२००६).

प्रकल्पाची किंमत वसूल करण्याकामी टोल हा उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्त्रोत (सोर्स) असल्याकारणाने शिफारस करण्यात येते की कंपनीने अचूक व व्यवहार्य अनुमान पद्धतीचा अवलंब करावा जेणेकरून खर्चाच्या वास्तविक आणि अपेक्षित वसुलीत कमीत कमी तफावत येईल. कंपनीने राज्य सरकारकडे नुकसान भरपाईकरिता नेटाने पाठपुरावा करावा. बीओटी तत्वावर प्रकल्प उभारणाऱ्या उद्योजकांचे नुकसान होऊ नये यासाठी सरकारने पण प्रकल्पाच्या खर्चाइतका टोल वसुल करु द्यावा.

हे प्रकरण सरकार / व्यवस्थापनास कळविण्यात आले होते (जून,२००९) त्यांच्याकडून उत्तरे अपेक्षित होती (डिसेंबर,२००९).

*** एप्रिल २००६ ते मार्च २००९ पासून ३६ महिन्यांकरिता रु.१.६९ कोटी ×१८ टक्के**

**३.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाने रोटेगांव येथील रेल्वे उड्डाण पुलासंबंधीचा प्रस्ताव दिनांक १० एप्रिल २००० रोजी पत्र क्र. एमएसआरडीसी/१२४७ अन्वये सादर केला होता. यामध्ये प्रकल्प खर्च रु. ६४४.६० लक्ष व सवलतींचा कालावधी डिसेंबर, २००७ पर्यंत अपेक्षित होता. तथापि, या प्रकल्पावरील प्रत्यक्ष खर्च रु. ४२१.०० लक्ष होता.

शासनाने दिनांक १५ डिसेंबर २००० च्या अधिसूचना क्र.पीएसपी/१०९९/प्र.क्र. १९५/ रस्ते-९ अन्वये प्रसिद्ध केली त्यानुसार सवलत कालावधी दिनांक २० सप्टेंबर २००० ते १९ सप्टेंबर २००३ असा ३ वर्षाचा होता. सुधारीत पथकरदराची अधिसूचना दिनांक १८ फेब्रुवारी २००२ च्या क्र. पीएसपी १०९९/प्र.क्र.१९५/रस्ते-९ अन्वये काढण्यात आली.

सा.बां.वि. ने प्रथमत: काढलेल्या अधिसूचनेनुसार पथकर वसुलीचा कालावधी २०००-२००३ होता व महामंडळाने विनंती केल्याप्रमाणे तो २०११ पर्यंत न वाढविता सन २००५ पर्यंत वाढविण्यात आला. पथकर वसुली सुरूवातीस सा.बां.वि. कडून करण्यात येत होती आणि नंतर ती म.रा.र.वि.म.कडे हस्तांतरित करण्यात आली. महामंडळाने पथकर वसुली दिनांक ८ मे २००२ पासून सुरू केली व ती डिसेंबर,२००५ मध्ये बंद करण्यात आली.

लेखा परीक्षणामधील मुद्यांबाबतचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे :—

१. लेखा परिक्षणामध्ये उल्लेखिल्याप्रमाणे रोटेगांव येथील रेल्वे उड्डाणपुलावरील खर्च रु. ४२१.०० लक्ष नसून रु. ४३३.४१ लक्ष इतका आहे.

२. सन २००५-२००६ पर्यंतची एकत्रित पथकर वसुली रु. ५५४.२८ लक्ष इतकी आहे.

यावरून स्पष्ट होईल की, रेल्वे उड्डाण पुलावरील खर्चाची वसुली महामंडळाने केली आहे व महामंडळाच्या नोंदीनुसार महामंडळास तोटा झालेला नसल्याने हा परिच्छेद वगळण्यात यावा.

**३.३** याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाने सादर केलेले स्पष्टीकरण वस्तुस्थितीवर आधारित असल्याने शासन स्तरावर कार्यवाहीची आवश्यकता नाही.

**३.४** तद्नंतर याप्रकरणी समितीला सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक ९ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ४.१४ मध्ये "टाळता येण्याजोगे नुकसान"** या आक्षेपासंदर्भात समितीने टोल वसुलीच्या महसुली चुकीचा अंदाज सादर करण्याचे कारण काय आहे तसेच सन २००७ पर्यंत ४ कोटी २१ लक्ष रुपये जमा होतील या अपेक्षेने निविदा तयार केली असेल, हे गणन कोणी केले, याबाबत विचारणा केली.

त्यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी, रोटेगांव जि. औरंगाबाद या ठिकाणी रुपये ४.२१ कोटी खर्चून रेल्वे ओव्हर ब्रिज बांधण्याकरिताचे काम होते. सदरहू काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कंत्राटी तत्त्वावर घेतले होते. या प्रकल्पामध्ये राज्य व रेल्वेचा ५०:५० टक्के असा हिस्सा होता. राज्य शासनाचा हिस्सा बीओटीच्या माध्यमातून उभा करावयाचा होता. हे काम सन २००० मध्ये पूर्ण झाले. कॅश फ्लो नुसार सन २००७ पर्यंत या प्रकल्पावर केलेला खर्च वसूल होण्याची अपेक्षा होती. मात्र नंतर टोल वसुली कमी झाली. सन २००१ मध्ये ८०.४२ लक्ष रुपये तर, सन २००२ मध्ये १ कोटी ९ लक्ष रुपये एवढी टोल वसुली झाली. ७ वर्षांची एकत्रित निविदा काढत नाही तर प्रत्येक वर्षाला निविदा काढली जाते असा खुलासा केला.

त्यावर समितीने विचारणा केली की, यामध्ये आयआरआर रेट किती दिला होता, शासनाचा १४ टक्के आयआरआर देण्याचा शासन निर्णय असताना व तो महाराष्ट्रातील सर्व प्रकल्पांना सारखाच लागू असताना तो १६ टक्क्यांनी देण्याचा निर्णय कोणी घेतला, यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी १६ टक्के इतका दिला होता. तो कॅश फ्लोमध्ये १८ टक्के धरलेला आहे. सन २००६ मध्ये शासनाला जे पत्र पाठविले आहे त्यामध्ये आयआरआर १६ टक्केच ग्रहीत धरलेला आहे. असा खुलासा केला त्यानुंषगाने समितीने विचारले की, शासकीय कोणतेही काम असले तरी ते शासनाकडे पाठवावे लागते, त्यामध्ये जरी ६ महिने गेले तरी, शासनाची मंजुरी मिळणे महत्त्वाचे असते. असे असताना आपण ही बाब शासनाच्या निदर्शनास का आणली नाही. शासनाकडे परवानगी घेतली पाहिजे होती तसेच समितीने दुसरा प्रश्न केला की, वर्दळ (ट्रॅफिक) कमी कशी काय झाली सदर अंदाज कोणी तयार केले, विभागाने की एजन्सीने, त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा करताना महामंडळाने शासनाला पत्र पाठविलेले आहे. मात्र शासनाने परवानगी दिली नाही.

त्या काळात नागपूर-सिन्नर-घोटी-मुंबई रस्ता तयार झाला व मुख्य वर्दळ त्या रस्त्याकडे वळल्याने अशी परिस्थिती निर्माण झाली. तत्कालीन अधिकाऱ्यांनी हे काम केले. त्यांनी ते प्रमाणित करावयास हवे होते. त्या वेळी जे अधिकारी या संदर्भात निर्णय प्रक्रियेत सहभागी होते, त्यांची नावे देखील देण्यात येतील असे समितीसमोर स्पष्ट केले.

यावर महालेखाकारांनी आयआरआर भार दर्शवून अंदाज दिला जातो. या प्रकरणात १८ टक्के आयआरआर दिलेला आहे. कंपनीने ७.२३ कोटी रुपये खर्च केले परंतु पथकराद्वारे केवळ ५.५४ कोटी रु. वसूल झाले. तसेच उत्तरामध्ये रोटेगाव येथील रेल्वे उड्डाण पुलावरील खर्च रु. ४२१ लक्ष असून रु. ४३३.४१ लक्ष इतका वसूल झालेला आहे. तसेच सन २००५-०६ पर्यंतची एकत्रित पथकर वसुली रु. ५५४.२८ लक्ष इतकी आहे. या नोंदीनुसार महामंडळास तोटा झालेला नाही असे नमूद केले आहे याबाबत घेतलेल्या आक्षेपावर खुलासा करताना महामंडळाच्या प्रतिनिधींनी खरे तर तोटा झालेला नाही, असे म्हणता येणार नाही, निधी प्रवाह पाहिला असता नुकसान झाल्याचे दिसून येईल. आयआरआर किती असावा हे शासनाने धोरण ठरवले पाहिजे असे समितीस सांगितले.

**३.५ अभिप्राय व शिफारस :—**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ४.१४ टाळता येण्याजोगे नुकसान (टोल वसुलीतून प्रकल्पाचा खर्च वसूल न झाल्यामुळे कंपनीस रुपये १.६९ कोटींचे नुकसान सोसावे लागले) या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बीओटी तत्वावर माहे जून,२००० मध्ये रोटेगांव (जि. औरंगाबाद) याठिकाणी रु. ४.२१ कोटी खर्च करून रेल्वेवर पूल (रेल ओव्हरब्रीज) बांधला या प्रकल्पावरील खर्च पथकराद्वारे सन २००७ पर्यंत वसूल होण्याची अपेक्षा होती. त्यानुसार महामंडळाद्वारे माहे डिसेंबर,२००७ पर्यंत टोल वसुली करण्याची परवानगी देणारी अधिसूचना निर्गमित करण्याची विनंती सार्वजनिक बांधकाम विभागाला करण्यात आली. सदर विभागाने फक्त दिनांक २० सप्टेंबर २००० ते दिनांक १९ सप्टेंबर २००३ या कालावधीकरिता पथकर वसुलीची सूचना काढली परंतु महामंडळाने माहे ऑगस्ट,२००३ मध्ये वाहनांच्या वर्दळीमध्ये घट झाल्याने टोल आकारणी सन २०११ पर्यंत वाढविण्यासंबंधी नवीन प्रस्ताव सादर केला. तथापि सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे डिसेंबर, २००५ पर्यंतच पथकर वसुलीस परवानगी दिली यावरुन कंपनीची टोल वसुलीची अंदाज पद्धती**

दोषयुक्त असल्याचे दिसून येते. महामंडळाचे सदर प्रकल्पावर रुपये ७.२३ कोटी खर्च झाले परंतु माहे सप्टेंबर,२००० ते डिसेंबर,२००५ या कालावधीत पथकराद्वारे रुपये ५.५४ कोटी वसूल होऊ शकल्याने महामंडळास रुपये १.६९ कोटी नुकसान सोसावे लागले यावरून असे स्पष्ट होते की, प्रकल्पावर खर्च केलेल्या रकमेची वसुली पथकराद्वारा करू न देण्याचा सार्वजनिक बांधकाम विभाग / शासन यांचा निर्णय बीओटी या तत्वाविरुद्ध आहे. तसेच रुपये १.६९ कोटीच्या नुकसानीची अद्याप शासनाने भरपाई दिलेली नाही व या भरपाईसाठी महामंडळानेही शासनाकडे पाठपुरावाही केल्याचे दिसून येत नाही.

सदर प्रकरणी चुकीची अनुमान पद्धती वापरल्याप्रकरणी तत्कालिन अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात यावी व महामंडळामार्फत भविष्यात उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाबाबत महामंडळाने / शासनाने साध्य-असाध्यतेचा अभ्यास करून नंतर अचूक व व्यवहार्य अनुमान पद्धतीचा अवलंब करावा तसेच बीओटी तत्वावर प्रकल्प उभारणाऱ्या उद्योजकांचे नुकसान होऊ नये याकरिता प्रकल्पाच्या खर्चाइतका पथकर वसूल करू द्यावा व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

## " महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित "

## (सन- २००९-२०१०)

**चार-मोकळी पडून राहिलेली यंत्रसामुग्री :- (वैरणीच्या विटा तयार करण्याचे सयंत्र मे २००८ मध्ये रु.३८.६२ लाख खर्चून संस्थापित केले होते ते वैरणीच्या विटांच्या मागणी अभावी निरर्थक पडून राहिले होते.)**

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१२ मध्ये " **मोकळी पडून राहिलेली यंत्रसामुग्री** " या संदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले होते की, भारत सरकारने चार* राज्यातील ३१ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये शेतीवर आधारित लोकसंख्येला पूरक उत्पन्न मिळावे म्हणून पशू व मत्स्य क्षेत्रात विशेष पॅकेज राबविण्याचे ठरविले (ऑगस्ट,२००६). महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) ने सादर केलेला फॉडर ब्लॉक उत्पादन युनिट स्थापन करण्याच्या प्रकल्पाचा प्रस्ताव भारत सरकारला पाठविला (फेब्रुवारी,२००७). प्रकल्पात पीक अवशेषाची नासाडी रोखून त्याचा पशूंसाठी चारा म्हणून फीड ब्लॉक्स बनवून त्याचा उत्पादक वापराचा विचार होता. कंपनीला विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यामध्ये फॉडर ब्लॉक उत्पादन युनिट बसवण्यासाठी रु.७४.३७ लाखाचे अनुदान (केंद्र सरकार - रु.४२.५० लाख व राज्य सरकार-रु.३१.८७ लाख) जुलै २००७ व मे २००८ मध्ये मिळाले होते.

अनुदान प्राप्त झाल्यानंतर कंपनीने फॉडर ब्लॉक युनिट स्थापण्याचा निर्णय घेतला (नोव्हेंबर,२००७). कंपनीने दरवर्षी ६०,००० ब्लॉक्स याप्रमाणे तीन वर्षांसाठी विकण्याचा अंदाज बांधला व रु.१५ लाखांची गुंतवणूक पाच वर्षात परत मिळविण्याचा अंदाज केला. आम्ही असे पाहिले की विक्रीचा अंदाज कुठल्याही पाहणी शिवाय व लक्षित घटकांच्या कोणत्याही प्रतिसाद अथवा उपयोगितेच्या माहितीबद्दल विभागातील शेतकऱ्यांकडून अंदाज न घेता व नव्या उत्पादनाची व्यवहार्यता न तपासता बांधण्यात आला होता. प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या हे संपूर्ण विरोधात होते. ज्यामध्ये प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा विचार करण्यावर भर होता व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)/ व्यावसायिक बँका बरोबर समन्वय साधुन व स्वयंसहाय्य बचत गटांचा (एसएचजी) सहभाग अपेक्षित होता. कंपनीने फॉडर ब्लॉक यंत्र पुरवण्यासाठी व उभारण्यासाठी निविदा नोव्हेंबर,२००७

* आंध्रप्रदेश (१६), कर्नाटक (६), केरळ (३), आणि महाराष्ट्र (६).

मध्ये मागविल्या व पोषक फीड्स इंडिया प्रायव्हेट मर्यादित यांना रु.३८.६२ लाखाचे प्रदान फेब्रुवारी, २००८ मध्ये दिले. वितरकाने यंत्रसामुग्रीचा पुरवठा व उभारणी मे,२००८ मध्ये केला व त्याची ट्रायल चाचणी (ऑक्टोबर,२००८) मध्ये घेतली. कंपनीने आजतागायत कुठलेही उत्पादन सुरू केले नाही व यंत्रसामुग्री उभारल्यापासून निरर्थक पडून होती. रु. ७४.३७ लाखाचा मिळालेल्या अनुदानापैकी कंपनीने रु.३८.६२ लाख केवळ फॉडर ब्लॉक यंत्रसामुग्री उभारण्यावर खर्च केले व शिल्लक रक्कम रु.३५.७५ लाख अखर्चित होती (डिसेंबर,२०१०). म्हणजेच, कंपनीने प्रकल्पाच्या राबविण्याविषयीच्या मार्गदर्शक तत्वांचा वापर न करता व फॉडर ब्लॉक्सच्या मागणीचे यंत्रसामुग्री उभारण्याअगोदरच चुकीचे अंदाज बांधल्यामुळे यंत्रसामुग्री मोकळी पडून राहिली. प्रकल्पाचे ठरवलेले फायदे त्यामुळे, शेतकऱ्यांच्या लक्षित घटकांपर्यंत पोचवता आले नाहीत. व्यवस्थापनाने यंत्रसामुग्री त्याच्या (मे,२००८) मधील उभारणी पासून निरर्थक पडून असल्याचे मान्य (जून,२०१०) केले. त्यांनी असे म्हटले की, त्या विभागात अनुदानित कम्पाऊंडेड कॅटल फिड उपलब्ध केली जात असल्यामुळे त्यांच्या उत्पादनाला मागणी नव्हती. उत्तरावरुन असे दिसून येते की, नोव्हेंबर २००७ मध्ये घेतलेली प्री-ऑपरेशन अंदाज व प्रकल्प सुसाध्यता चुकीची होती कारण त्यात खऱ्या गरजेचा विचार झाला नव्हता. व्यवस्थापनाचे उत्तर शेतकऱ्यांना फॉडर ब्लॉक टेक्नोलॉजी वापरण्यासाठी देण्याचा प्रयत्न केला गेला नाही ते प्रकल्प राबविण्याच्या प्रक्रियेतील अपर्याप्तता दर्शविते.

**शिफारसीमध्ये असे सुचविण्यात येते की :**

- प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याअगोदर विस्तृत संदर्भ निश्चित सुसाध्यता अहवाल तयार करावा.
- अशा पाहणीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा लक्षपूर्वक अभ्यास समाविष्ट असावा.
- पाहणी अहवालात शेतकऱ्यांच्या स्वयंसहाय्य बचत गटाकडून तांत्रिक बदल स्वीकारण्याविषयी मत व त्यांच्या उपयोगितेबद्दल विचार हा प्रमुख घटक असावा.

ही बाब शासनाला कळविण्यात (मे, २०१०) आली होती; त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २०१०).

४.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाला विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यामध्ये वैरणवीट उत्पादन केंद्र स्थापित करण्यासाठी रु. ७४.३७ लाखाचे अनुदान मिळाले, यामध्ये केंद्र सरकारचे रु. ४२.५० व राज्य सरकारचे रु.३१.८७ लाखाचा समावेश आहे.

मे. पोषक फीड्स इंडिया प्रायव्हेट यांनी सदरचे सयंत्राची यवतमाळ येथे माहे २००८ मध्ये उभारणी केली. त्याकरिता रु. ३८.६२ लाख मे.पोषक फीड्स यांना अदा केले. त्या सयंत्राची चाचणी ऑक्टोबर,२००८ मध्ये घेण्यात आली. सदरच्या सयंत्र/यंत्रसामुग्रीची हमी एक वर्षाची होती. त्यानंतर सदरचे वैरणवीट सयंत्र दिनांक ५ मे २००९ रोजी कार्यान्वित केले व त्याचे चाचणी उत्पादन घेण्यात आले. त्यावेळी यंत्र/ सयंत्रामध्ये कोणताही दोष नव्हता.

सयंत्र जरी सुरू झालेले असले तरी व्यापारी उत्पादन घेण्यात आले नाही. कारण इतर उत्पादनाप्रमाणेच स्थानिक पातळीवर या उत्पादनाला (वैरणवीट) मागणी नव्हती. या उत्पादनांस विदर्भाच्या भागात अत्यल्प मागणी लक्षात घेता आम्ही मा. आयुक्त (पशुसंवर्धन) यांना विनंती केली की, सदर वैरणवीटेचा समावेश अनुदान योजनेअंतर्गत (पंतप्रधान पॅकेज) मध्ये करावा, जेणे करून वैरणवीटची मागणी वाढेल. ही योजना पश्चिम महाराष्ट्रात ही लागू करावी, तेथे वैरणवीटेला चांगला प्रतिसाद मिळेल. त्यामुळे तेथे सयंत्र विनावापर पडून राहणार नाही.

प्राप्त झालेल्या रु.७४.३७ लाखांपैकी रु.३८.६२ लाख यंत्रसामुग्रीवर खर्च झाले व उर्वरित रक्कम ही स्थापत्य कामे जसे की उदा. गोदाम इमारत, वजन काटा इ. साठी उपयोगात येणार आहे.

सदरच्या वैरण वीटेच्या सयंत्राकरिता गोदामाचे बांधकाम करावयाचे आहे, मात्र यवतमाळ येथील कारखान्याच्या मालकाकडे जागेसंबंधी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे स्थापत्य बांधकाम स्थगित केले आहे. सदर व्यवस्था व गोदाम बांधकामास लागणारा वेळ लक्षात घेता आम्ही अतिरिक्त गोदाम भाड्याने घेण्याचे ठरविले आहे.

हा प्रकल्प सोबत जोडलेल्या उपयोगिता अहवालावर आधारित आहे.

४.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

४.४ तद्नंतर या प्रकरणी समितीला कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ३.१२ मध्ये " मोकळी पडून राहिलेली यंत्रसामुग्री "** या आक्षेपासंदर्भात समितीने महामंडळाच्या प्रतिनिधींना यवतमाळ जिल्ह्याकरिता वैरणीच्या विटा तयार करण्याचे सयंत्र माहे मे, २००८ मध्ये रु. ४२.५० लाख खर्चून संस्थापित केले होते. ते वैरणीच्या विटांच्या मागणी अभावी निरर्थक पडून राहिले. भारत सरकारने चार जिल्ह्यांतील ३१ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये शेतीवर आधारित लोकसंख्येला पूरक उत्पन्न मिळावे याकरिता पशू व मत्स्य क्षेत्रात विशेष पॅकेज राबविण्याचे ठरविले व त्याकरिता निधी देखील दिला. मात्र सदरहू निधी खर्च करून उभारलेली यंत्रसामुग्री जेथे शेतकरी आत्महत्या होत नाहीत अशा भागात स्थलांतरित केली, सदर यंत्रसामुग्री बंद अवस्थेत ठेवण्यात आली आहे. याबाबत विचारणा केली असता महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी असा खुलासा केला की, पशुंसाठी चारा म्हणून वैरण विटा तयार करण्याकरिता यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्या उत्पादनाला शेतकऱ्यांकडून मागणी नसल्याने यंत्रसामुग्री पडून राहिली आणि आता ती पिंपरी चिंचवड-पुणे येथील महामंडळाच्या पशुखाद्य कारखान्यात स्थलांतरित केली आहे.

यवतमाळ जिल्हा आत्महत्याग्रस्त असल्याने त्या जिल्ह्यासाठी सन २००८-२००९ मध्ये ही यंत्रसामुग्री खरेदी केली होती. मात्र तेथे मागणी अभावी व्यवसाय होऊ शकला नाही. सन २०१४ च्या डिसेंबर महिन्यामध्ये शिफ्टींगचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर सदरहू यंत्रसामुग्री दुरुस्त करण्यात आली असून ती वापरण्यायोग्य स्थितीत आहे. यावर समिती प्रमुखांनी महामंडळाच्या प्रतिनिधींना विचारणा केली की, महामंडळाच्या काही योजना नफ्यामध्ये आहेत. मग या उपक्रमाच्या बाबतीत यंत्रसामुग्री पडून राहण्याची कारणे काय आहेत. तसेच या उपक्रमामध्ये पणन आणि विक्रीमध्ये काय अडचण आली, पशु खाद्य वैरण वीटा (ॲनिमल फिड ब्लॉक्स) आणि पशुधन पशुखाद्य (लाईव्हस्टॉक ॲनिमल फिड) यामध्ये काय फरक आहे, तसेच सन २००८ पासून शेतकऱ्यांकडून काहीही मागणी नाही म्हणून उपयोग करु शकलो नाही, याबाबत महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी असा खुलासा केला की, मागणी अभावी व्यवसायिकरित्या उत्पादन करून ते विकले जाऊ शकले नाही.

सदर उत्पादनाचा ब्रँड यवतमाळ येथे प्रस्थापित होऊ शकला नाही कारण उत्पादनाला मागणी नव्हती, त्यामुळे जास्त व्यवसाय होऊ शकला नाही.

यानंतर समितीने महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना अशी विचारणा केली की, वैरणीच्या वीटा बनविण्याकरिता लागणारी यंत्रसामुग्री बसविण्यासाठी यवतमाळ जिल्ह्याची निवड का केली, अमरावती जिल्ह्याची निवड का केली नाही, तसेच वितरकाने यंत्रसामुग्रीचा पुरवठा व उभारणी मे, २००८ मध्ये केली. कंपनीने आजतागायत कुठलेही उत्पादन सुरू केले नाही व यंत्रसामुग्री उभारल्यापासून निरर्थक पडून होती. सयंत्र उभारणीकरिता खर्च केलेले ४२.५० लाख रुपये वाया गेले. उर्वरित पैसे कोठे आहेत, तसेच सदरच्या वैरण वीटेच्या सयंत्राकरिता गोदामाचे बांधकाम करावयाचे आहे, मात्र यवतमाळ येथील कारखान्याच्या मालकाकडे जागेसंबंधी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे स्थापत्य बांधकाम स्थगित केले आहे. सदर व्यवस्था व गोदाम बांधकामास लागणारा वेळ लक्षात घेता अतिरिक्त गोदाम भाड्याने घेण्याचे ठरविले आहे.

याप्रकरणी महामंडळाच्या प्रतिनिधींनी व विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या उत्पादनास असलेली अत्यल्प मागणी लक्षात घेता सदर वैरण वीटेच्या योजनेचा समावेश अनुदान योजनेंतर्गत पंतप्रधान पॅकेजमध्ये करावा, अशी विनंती केली होती. एका वैरण विटेची किंमत १०० रुपये होती. यासाठी केंद्र शासनाकडून २५ रुपयांची सबसिडी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सदरची वैरण वीट ही शेतकऱ्यांकरिता ८५ रुपयांना मार्केटमध्ये उपलब्ध होती. जर २५ रुपयांची सबसिडी केंद्र शासनाकडून प्राप्त झाली असती तर तो ब्लॉक ६० रुपयांना शेतकऱ्यांकरिता उपलब्ध झाला असता. काही मागणी आल्यानंतर प्रायोगिक तत्वावर उत्पादन चालू केले होते. परंतु त्यानंतर पुन्हा मागणी आली नाही. मागणी आल्यावर ऑगस्ट,२००९ मध्ये ५ टन प्रायोगिक तत्वावर उत्पादन घेण्यात आले होते. मात्र प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेले उत्पादन विकले न गेल्याने व्यापारी उत्पादन घेण्याची वेळच आली नाही.

पुन्हा मागणी न आल्यामुळे व्यापारी तत्वावर उत्पादनासाठी वाव राहिला नाही. तसेच इतर ठिकाणी उत्पादन विक्रीकरिता न्यायचे झाले तर, वाहतूक खर्च जास्त होता. सयंत्र उभारणीची उर्वरित रक्कम रुपये ३१.८७ लाख बँकेत आहेत. हे ३१.८७ लाख रुपये शासनाला परत करावयास हवे होते. मात्र शासनाकडून महामंडळाला १२० कोटी रुपयांचे येणे असल्यामुळे हे पैसे समायोजित करावेत, अशी विनंती महामंडळाने शासनाकडे केली आहे. सदरच्या वैरण वीटेच्या सयंत्राकरिता

गोदाम महामंडळ बांधणार नाही. यवतमाळ येथील कारखाना अगोदर महामंडळाने चालविण्यास घेतला होता. नंतर ते प्रकरण न्यायप्रविष्ट झाले कारण मूळ मालकाने कारखाना परत मागितला होता. त्यामुळेच स्थापत्य बांधकामही करता आले नाही. यामध्ये महामंडळाने कारखान्याच्या अधिग्रहणाकरिता रुपये ५४ लाख खर्च केला होता. आता या प्रकरणामध्ये समझोता झालेला आहे. महामंडळाला त्याच्याकडून काही रक्कम येणे होती, सदरची रक्कम भाड्याच्या रकमेमधून वजा करण्यात आली आहे.

यानंतर समितीने यवतमाळ येथील कारखान्याद्वारे किती उत्पादन घेतले जात होते अशी विचारणी केली याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी दरवर्षी पाच ते सहा हजार टन पशुखाद्याचे उत्पादन होत होते. सदर यवतमाळ येथील कारखान्यास भाडे नव्हते. तसेच कारखान्याच्या मालकाकडे जागेसंबंधी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे वाद न्यायालयामध्ये गेला होता. महामंडळाने रक्कम दिली असून देखभाल, दुरुस्तीसाठी ५४ लाख रुपये खर्च केले, महामंडळाची एकूण रक्कम २.५० कोटी रुपये येत होती. ती रक्कम परत घेऊन त्यांना कारखाना परत देण्यात आला. सदरहू जागेचे महानगरपालिकेच्या असलेल्या संपूर्ण खर्चाच्या मोबदल्यात महामंडळाला १८ टक्के जागा मिळाली. त्या जागेची बाजारभावानुसार १० कोटी रुपये किंमत मिळाली असा समितीसमोर खुलासा केला.

४.५ **अभिप्राय व शिफारस :**—भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१२ **“मोकळी पडून राहिलेली यंत्रसामुग्री” (वैरणीच्या विटा तयार करण्याचे सयंत्र मे २००८ मध्ये रु. ४२.५० लाख खर्चून संस्थापित केले होते ते वैरणीच्या विटांच्या मागणीअभावी निरर्थक पडून राहिले होते.)** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी अमरावतीमध्ये पोषक या नावाची कंपनी वैरण वीटा (फिड ब्लॉक्स) बनवून विकत आहे. **तथापि यवतमाळमध्ये वैरणीच्या वीटा विकता येऊ शकल्या नाहीत ही बाब समितीच्या निदर्शनास आली. राज्यात काही भागात खाजगी कंपन्या कमी दराने वैरण वीटांची विक्री करतात तसेच उत्पादनाचा व्यवस्थित प्रचार करुन त्यांची विक्री करीत आहेत, त्यामुळे समिती अशी शिफारस करीत आहे की, पशुखाद्य म्हणून सदर उत्पादनाचा प्रचार आणि प्रसार तसेच ब्रँड प्रस्थापित करणे आवश्यक आहे. तसेच आत्महत्त्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या पशुंसाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वैरण वीटांचे सयंत्र बसविण्यासाठी भारत सरकारच्या विशेष पॅकेज अंतर्गत केंद्र व राज्य सरकारचे अनुदान मिळाले होते. तथापि, सदर वैरण वीटा संयंत्र यवतमाळ जिल्ह्याकरिता आणलेले असूनही पिंपरी-चिंचवड येथे ठेवण्याचे महामंडळाचे प्रयोजन काय आहे तसेच सदर वैरण वीटांच्या सयंत्राद्वारे आत्तापर्यंत किती उत्पादन घेण्यात आले याबाबतची माहिती समितीस अवगत करण्यात यावी.**

काही शासकीय योजना केवळ कागदावरच राहतात, कारण शेतकऱ्यांना त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहितीच प्राप्त होत नाही. त्यास्तव शासनाचे अधिकारी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कृषी उद्योगाशी निगडीत काही खाजगी कंपन्यांनी जाणीवपूर्वक वैरणीच्या वीटा तयार करण्याची शेतकऱ्यांकरिता सुरू केलेली शासनाची योजना हेतूपुरस्सररित्या बंद व्हावी यादृष्टीने प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यामुळे कृषी विभाग, तालुका कृषी अधिकारी यांनी मिळून समूह पद्धतीने **(Team Work)** काम केले असते तर वैरणीच्या वीटा विक्री करण्याचे काम व उत्पादन व्यवस्थितरित्या झाले असते. असे समितीचे मत झाले आहे. राज्यात बऱ्याच वर्षांपासून पाण्याचे दुर्भीक्ष आहे. जनावरांना चारा नाही, चारा डेपोमध्ये लवकर चारा उपलब्ध होत नाही. यामध्ये महामंडळाने वैरण वीटा सयंत्राद्वारे चारा उपलब्ध करून देण्याचे चांगले काम केले असते तर महामंडळाला बाजारपेठ मिळाली असती व ते शेतकऱ्यांच्या हिताचे झाले असते तसेच वैरण वीटासाठी शासनाने २५ रुपये अनुदान देणे गरजेचे होते, त्यामुळे शेतकऱ्याला जागेवर एक ब्लॉक साधारणतः ६० ते ६५ रुपयांना मिळाला असता व शेतकरी या दराने वैरणीच्या वीटा घेऊ शकला असता असे समितीचे मत आहे. तरी याप्रकरणी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना रास्त दराने पशुखाद्य उपलब्ध होण्यासाठी व वैरण वीटांना अनुदान प्राप्त होण्याच्या दृष्टीने पाऊले उचलावीत व त्यानुसार केलेला कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.

## "महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित"

## (सन- २०११-२०१२)

**पाच-निष्फळ खर्च :—(रु.८.४६ कोटी परिव्यय असलेल्या फुल लिलाव केंद्राचे बांधकाम २००७ मध्ये करण्यात आले जे अद्यापही वापरात आणले नव्हते).**

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१ मध्ये "**निष्फळ खर्च**" या संदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितने (कंपनी) गोरेगांव येथे फुल लिलाव केंद्राचे (एफएएच) बांधकाम रु.८.४६ कोटी * परिव्यय करून ऑगस्ट,२००७ मध्ये पूर्ण केले ज्याची दररोज चार लाख फुलांची आवक हाताळण्याची क्षमता असून सुरूवातीला दररोज २.४० लाख फुलांची आवक होईल असा अंदाज लावण्यात आला होता. परंतु कंपनीने वर्ष २०१०-११ चा वार्षिक लेख्यांमध्ये तो खर्च मत्तेत न दाखवता चालू काममध्ये दाखविले होते.

आमच्या असे निदर्शनास आले (मे,२०११) की, जरी प्रकल्प ऑगस्ट,२००७ मध्ये पूर्ण झाला होता. कंपनीने हा प्रकल्प ३२ महिन्यांच्या विलंबानंतर एप्रिल,२०१० मध्ये प्रायोगिक तत्वावर सुरू केला. कमी प्रमाणात फुलांची आवक सुरू झाली होती व वाहनांची व्यवस्था नसल्यामुळे फुल उत्पादकांकडून फुलांचा पुरवठा बंद झाला होता. कंपनीने (मे,२०१०) मध्ये फुले पाठविण्यासाठी तळेगांव ते गोरेगांव एफएएच पर्यंत स्वतंत्र वाहनांची व्यवस्था करण्याचे ठरविले. तरीसुद्धा फुले उत्पादकांकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्यामुळे जुलै,२०१० पासून वाहनांची व्यवस्था बंद करण्यात आली. तसेच, असे निदर्शनास आले की, प्रकल्प सुरू करण्याआधी स्टेक होल्डर पृथ:करण केले गेले नव्हते. परीणामतः रु.८.४६ कोटी किंमतीचे फुल लिलाव केंद्र पूर्ण झाल्यापासून निष्क्रिय पडून राहिले होते.

व्यवस्थापनाने लेखापरीक्षणाचे आक्षेप मान्य केले (ऑगस्ट,२०१२) व असे म्हटले होते की, भविष्यात एफएएचचा वापर करण्यासाठी शासनाच्या मदतीने प्रयत्न केले जातील. शासनाने या उत्तरास दुजोरा दिला (ऑक्टोबर,२०१२) परंतु, वस्तुस्थिती राहतेच की कंपनीची रु.८.४६ कोटी किंमतीची मत्ता निष्क्रिय पडून राहिली. (सप्टेबर,२०१२) आणि कंपनीने, कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मागणी असतांना देखील एफएएच भाड्यावर देण्याचा पर्याय अवलंबला नव्हता.

*** यामध्ये ३१ मार्च २०११ पर्यंत रु. ०५२ कोटी प्रशासकीय व इतर खर्चाचा समावेश होता.**

५.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने अपेडा कायदा, १९८५ अंतर्गत कृषी व अन्न प्रक्रिया निर्यात विकास प्राधिकरण या सर्वोच्च नोडल एजन्सीची स्थापना केली. यात प्रामुख्याने कृषी निर्यातीस प्राधान्य, फुल शेती क्षेत्र विकास अंतर्गत हॉलंड येथे पणन केंद्रे उभारणी, विमानतळाजवळील नाशिवंत केंद्रे, तसेच बैंगलोर, दिल्ली, मुंबई, येथे घाऊक बाजार पेठ, फुल लिलाव केंद्र इत्यादी उभारण्यासाठी समावेश होतो.

सन १९९६ अपेडाच्या वतीने युरोपियन ऑक्शन बिल्डर्स यांचेकडून प्रामुख्याने मुंबई येथे घाऊक बाजार पेठेची उभारणी करण्याकरिता व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यात आला. व सविस्तर प्रकल्प अहवालात अंतर्गत अंदाजे मालगणना, अपेक्षीत उलाढाल, मूल्य अंदाजपत्रक, एकूण आवश्यक निधी, प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, इत्यादी बाबी म.कृ.उ.वि. महामंडळातर्फे तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अहवाल (TEFR) च्या धर्तीवर अपेडाकडे सादर करण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाने निर्गमीत केलेल्या आदेशानुसार म.कृ.उ.वि. तथा नोडल एजन्सी यांनी जुलै,२००१ मध्ये केलेल्या सामंजस्य कराराद्वारे लिलाव तथा घाऊक बाजारपेठ केंद्राची मुंबई येथे उभारणी करण्याचे संमत केले.

युरोपियन ऑक्शन बिल्डर्स यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल हा त्या क्षेत्राचा अभ्यास, प्रत्यक्ष संग्रहीत माहिती व प्रत्यक्ष परिणाम या मार्गदर्शक तत्वांवर आधारीत होता.

सन २०११ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई यांनी सदरची सुविधा कार्यान्वित करण्याच्या दृष्टिने खालील तत्वावर महामंडळाला अनुकुलता दर्शविली.

(a) फुल लिलाव केंद्राची सुविधाही कृषी उत्पन्न बाजार समितीस सद्य बाजार मुल्यांकनाने संपूर्णपणे हस्तांतरीत करणे.

(b) दिर्घकाळ भाडे पट्टा तत्वावर चालविण्यास देणे.

(c) महसूल वाटप तत्वावर चालविणे.

कृषी उत्पन्न बाजार समितीने देऊ केलेला प्रथम पर्याय जमीनचे मालकी तत्वावर हस्तांतरण व देऊ केलेले आर्थिक अनुदान व्यवहार्य वाटप नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीने दिलेले इतर दोन पर्याय निश्चित स्वरुपाचे नव्हते. या विषयावर मा.कृषी मंत्री तथा अध्यक्ष यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन विस्तृत चर्चा केली. सदर बाबीची चर्चा म.कृ.उ.वि.म. च्या संचालक मंडळांच्या बैठकीतही करण्यात आली. दरम्यान कृषी उत्पन्न बाजार समिती नियमन कायदा, १९६३ अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समितीला कृषी मालाच्या नियमीतासाठी स्थापन करण्यात आले आहे. सद्यःस्थितीत " फुले " ही त्यांच्या नियमना अंतर्गत येत नाही. फुले ही कृषी माल या संवर्गात मोडण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला आहे. यास्तव कृषी उत्पन्न बाजार समितीला भाडे तत्वावर देण्याबाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२६ एप्रिल २०१० ते ९ जुलै २०१० या दरम्यान महामंडळाने फुले लिलाव केंद्र प्रायोगिक तत्वावर कार्यान्वित केले. या दरम्यान फुल पुरवठा अतिशय कमी प्रमाणात होता. दर दिवशी अपेक्षित असलेल्या ६० पेट्या ऐवजी १० पेट्या प्रत्यक्षात प्राप्त होत असल्याने खरेदी मूल्य देखील प्राप्त होत नव्हते. झालेला खर्च व प्रायोगिक तत्वावर मिळालेला महसूल खालील प्रमाणे :–

| | |
|---|---|
| फूल विक्रीतून प्राप्त महसूल | १०.६१ लाख |
| (-) वजा-फुलांची किंमत | ९.८० लाख |
| शिल्लक | ०.८४ लाख |

तसेच विद्युत, सुरक्षा, वाहतूक व स्वच्छता या पोटी महामंडळास रु. ३.७० लाख एवढा खर्च आला व रु. १.३५ लाख कामगारांच्या पगारापोटी देण्यात आले, यामुळे महामंडळास रु. ४.२१ लाख तोटा झाला. आज पावेतो फुल लिलाव केंद्राची सुविधा व्यावसायिकरित्या कार्यान्वित केलेली नसून, कार्यालेख व नफ्याविषयीची आकडेवारी त्यास्तव काढता आली नाही.

फुल लिलाव केंद्र या प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च रु. २२.२२ कोटी एवढा झाला तो खालीलप्रमाणे आहे.

तक्ता १ प्रकल्प मूल्य :- (रु. लाखात)

| तपशील | टप्पा-१ |
|---|---|
| जमीन | १२००.०० |
| जागेसाठीचा विकास खर्च | ४०.०० |
| इमारत | ३८८.२४ |
| यंत्रसामुग्री | ३४४.३५ |
| इतर स्थावर मालमत्ता | १११.०० |
| कार्यपूर्व खर्च | ४५.०० |
| आकस्मित खर्च | ६९.०९ |
| तांत्रिक बाबीवरील खर्च | २५.०० |
| एकूण | २२२२.६८ |

ऑगस्ट,२००७ मध्ये फुल लिलाव केंद्राचे स्थापत्य काम पूर्ण झाले व आजपावेतो या प्रकल्पावर रु. ८.४६ कोटी रुपयाची (जमीन मूल्य वगळता) गुंतवणूक करण्यात आली. अपेडा यांनी सदरहू प्रकल्पासाठी रु.७.२४ कोटीचे अनुदान दिले असून उर्वरित रक्कम रु. १.२२ कोटी महामंडळाने गुंतविले आहेत.

या व्यतिरिक्त फुल विक्री लिलाव करण्यासाठी संगणकीकरण प्रणाली व इतर संकीर्ण खर्च करिता अंदाजे रु. १.७५ कोटी खर्च अपेक्षित आहे. फुल लिलाव केंद्राकरिता झालेला खर्च सद्यःस्थितीत अपूर्ण भांडवली कामे या लेखा शिर्षाखाली समाविष्ट केलेला आहे. तथापि सदर लिलाव केंद्राचे काम पूर्ण झाल्यावर संपूर्ण खर्चाचे भांडवलीकरण करण्यात येईल.

**५.३** याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**५.४** तद्नंतर याप्रकरणी समितीला कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचे व्यवस्थापकीय

संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक ७ ऑक्टोबर,२०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ३.१ मध्ये "निष्फळ खर्च"** या आक्षेपातील फुल लिलाव विक्री केंद्राबाबत चा प्रस्ताव कोणाकडून तयार करण्यात आला व प्रकल्प तयार करण्यासाठी निविष्टी (input) कोणी दिले याबाबत विचारणा केली.

यावर पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक व महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी खुलासा केला की, सदरच्या फुल लिलाव विक्री केंद्राच्या (फ्लॉवर ऑक्शन हॉल) सुविधांकरिता (फॅसिलीटी) अपेडाने अर्थसहाय्य केले होते. त्यास ८.४६ कोटी रुपये लागले होते, फुल लिलाव विक्री केंद्र सुरू झालेही नव्हते त्याच दरम्यान सन २०१३ मध्ये निर्यातीसाठी सुविधा निर्माण करण्याचा प्रस्ताव आला त्यानुसार महामंडळाने याचा अभ्यास करून या संदर्भात काय करता येईल याकरिता अपेडाला विचारणा केली. तसेच तशी सुविधा उभी करण्यात आली आणि या वर्षी गोरेगांव, मुंबई मधून ३०० मे.टन आंबा निर्यात करण्यात आला. फुल लिलाव विक्री केंद्राचे बांधकाम सन २०१० मध्ये पूर्ण झाले. मात्र मागील ५ वर्षापासून ते पडून आहे. प्रकल्प अहवाल व प्रत्यक्षातील स्थिती यामध्ये बराच फरक होता. प्रकल्प अहवालानुसार दर दिवशी १० लाख रुपयांचा नफा झाला असता. मात्र प्रत्यक्षात एकूण १२ लाख रुपयांचा खर्च झाला. सदर जमीन महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाची होती. या जागेची किंमत १२ कोटी रुपये होती.

यानंतर समितीने महामंडळास या प्रकल्पाकरिता निविष्टी (Input) देण्यामध्ये चूक झाल्याचे दिसून येते चुकीची निविष्टी कोणी दिली याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी असे सांगितले यावर महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी युरोपियन ऑक्शन बिडर्स या कन्स्ल्टंट मार्फत प्रस्ताव तयार करण्यात आला होता. हा प्रस्ताव अपेडाने मान्य केला व निविष्टी (Input) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून देण्यात आले. हा व्हाएबल बिझनेस नव्हता. जागेची किंमत लक्षात घेता १० लाख रुपयांचा नफा होईल असा अदाज होता. दादर येथील फुल मार्केट बंद केले जाईल, ही बाब गृहीत धरुन प्रामुख्याने हा प्रोजेक्ट सुरू करण्यात आला होता. दादर मधील फुल मार्केट बंद झाले असते तरच येथील व्यवसाय स्थलांतरीत झाला असता. मात्र काही कारणामुळे येथील मार्केट बंद करणे शक्य झाले नाही, त्यामुळे गोरेगाव येथे नवीन मार्केट सुरू करता आले नाही. सदर प्रकल्प सुरू करण्याकरिता जे गृहीत धरले होते, ते शक्य झाले नाही, त्यामुळे प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही.

सदर फुल लिलाव विक्री केंद्राची जागा ३५ हजार स्क्वे.फू. असून ती महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या मालकीची आहे. या जागेकरिता शासनाला वार्षिक १२ लाख रुपये लिज रेंट दिले जाते. महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून वाहतूक व्यवस्था सुरू करण्यात आली होती. मात्र तरी देखील नुकसान होत होते. फुलांची विक्री झाली नाही असा समितीस खुलासा केला.

५.५ **अभिप्राय व शिफारस :**—भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ३.१ "निष्फळ खर्च" (रु.८.४६ कोटी परिव्यय असलेल्या फुल लिलाव केंद्राचे बांधकाम सन २००७ मध्ये करण्यात आले जे अद्यापही वापरात आणले नव्हते).** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी **महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितने गोरेगाव (मुंबई) येथे फुल लिलाव केंद्राचे बांधकाम माहे ऑगस्ट, २००७ मध्ये रु. ८.४६ कोटी परिव्यय करून पूर्ण केले ज्याची दररोज चार लाख फुलांची आवक हाताळण्याची क्षमता असूनही फुल लिलाव केंद्र सुरू करण्याआधी साठवण धारक (स्टाक होल्डर) पृथःकरण करण्यात आलेले नसल्यामुळे महामंडळाची रु.८.४६ कोटीची मत्ता निष्क्रीय पडून राहिली अशी समितीस माहीती प्राप्त झाली त्यामुळे फुल लिलाव विक्री केंद्र ही योजना चांगल्या पद्धतीने राबविली असती तर शेतकऱ्यांचा निश्चितपणे फायदा झाला असता.** पुण्याजवळ इंद्रायणी नदीकाठावर एमआयडीसीच्या ५०० एकर जमिनीवर फुल शेती केली जाते. तसेच सातारा, जुन्नर इत्यादी भागातून मोठ्या प्रमाणात फुले विक्रीकरिता येतात. तेथे फुलांची लागवड केली जाते. या भागातून फुले कंटेनरमधून निर्यात करण्याकरिता मुंबईला आणली जातात. **मुंबईतील दादर येथील फुल मार्केट पूर्णतः व्यस्त असते. या फुल मार्केटमध्ये निर्यातक्षम फुलांची विक्री करण्यात येते तथापि, फुले नाशवंत स्वरूपाचे कृषी उत्पादन असल्यामुळे शीतगृह (Cold Storage) आवश्यक आहे असे समितीचे मत झाले आहे. त्यामुळे समितीतर्फे अशी शिफारस करण्यात येत आहे की, गोरेगांव येथे फुलांसाठी शीतगृहाची (Cold Storage) व्यवस्था उपलब्ध करून देण्यात यावी. जेणेकरून निर्यातक्षम फुलांची वाहतूक गोरेगांव नजीक असणाऱ्या सहार व सांताक्रुझ येथील आंतरराष्ट्रीय (International Airport) व देशांतर्गत (Domestic Airport) विमानतळावरुन निर्यात करणे सोयीचे होईल.**

**गोरेगाव सारख्या फुल लिलाव विक्री केंद्राची आवश्यकता महामंडळाला व पणन मंडळाला फुलांच्या व्यापाऱ्यांना व्यवस्थितरित्या समजावून देता आली नाही तसेच दादर येथील फुलांचे व्यापारी अनेक वर्षांपासून व्यापार करीत आहेत. जोपर्यंत अधिक चांगली सुविधा शासनाकडून/महामंडळाकडून उपलब्ध करून दिली जात नाही, तोपर्यंत फुलांचे व्यापारी गोरेगाव फुल लिलाव केंद्र येथे स्थलांतरित होण्यास तयार होणार नाहीत असे समितीचे मत आहे. सबब समितीच्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा. अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

**सहा-प्राप्तीकरावर टाळता येऊ शकणाऱ्या व्याजाचे देणे :—(अंदाजित उत्पन्नावर आगाऊ कराचा भरणा करण्यात कसूर केल्याने प्राप्तीकराच्या रकमेवर व्याजाचे रु.७८.६७ लाख टाळता येण्याजोगे प्रदान करावे लागले).**

**६.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-१२ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.३ मध्ये "**प्राप्तीकरावर टाळता येऊ शकणाऱ्या व्याजाचे देणे**" या संदर्भात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले होते की, प्राप्तीकर कायदा, १९६१ च्या कलम २०८ व २१० नुसार करपात्र उत्पन्न असणाऱ्या कंपन्यांना आर्थिक वर्षाच्या प्रत्येक तिमाहीस (१५ जून, सप्टेंबर, डिसेंबर आणि मार्च) निर्धारित दराने (अनुक्रमे १५, ४५, ७५ आणि १०० टक्के) अंदाजित उत्पन्नावर आगाऊ प्राप्तीकर भरावा लागतो. अशा आगाऊ कर भरणा करण्यात कसूर केल्यास कलम २३४ सी अन्वये निर्धारित रकमेपेक्षा कमी भरलेल्या आगाऊ प्राप्तीकराच्या रकमेवर व्याज भरावे लागले. याशिवाय, एकूण आगाऊ भरलेला कर अंतिम कर आकारणीच्या ९० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर कलम २३४ बी मधील तरतुदींनुसार व्याज भरावे लागते. आमच्या असे निदर्शनास (मे,२०११) आले की कंपनीने आपल्या क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे आपल्या अंदाजित उलाढाल व उत्पन्नाचा अंदाज बांधला. परंतु क्षेत्रिय कार्यालयांकडून माहिती संकलन करण्यासाठी परिणामकारक तसेच कालबद्ध प्रणालीच्या अभावामुळे कंपनीला अचूकपणे विक्री व खर्च लेख्यांमध्ये नोंदणी करता न आल्याने आगाऊ भरावयाच्या प्राप्तीकराची रक्कम अचूकपणे निश्चित करता आली नाही. याशिवाय, कंपनीने प्रारंभी काही तरतुदी विचारात घेऊन, जसे की बुडीत ऋण, महागाई भत्त्यांची थकबाकी, ग्रॅच्यूईटी वगैरे,आगाऊ भरावयाच्या प्राप्तीकराची रक्कम कमी निश्चित केली होती. परंतु लेख्यांना अंतिम रुप देताना ह्या तरतुदी काढून टाकण्यात आल्या. कंपनीचे २००८-०९ व २०१०-११ या आर्थिक वर्षात एकूण उत्पन्न अनुक्रमे रु.१४.९३ कोटी व रु.२७.८१ कोटी इतके होते त्यावर नक्त देय आयकराची रक्कम रु.५.०७ कोटी आणि रु.९.१७ कोटी अनुक्रमे निश्चित झाली. परंतु, सन २००८-०९ आणि २०१०-११ मध्ये अंतिमतः आकारणी केल्या गेलेल्या आयकराच्या रकमेपेक्षा आगाऊ कर कमी भरल्याने कंपनीस रु.७८.६७ लाखांचे व्याज भरावे लागले (रु. ३८.५० लाख आणि रु. ४०.१७ लाख अनुक्रमे २००८-०९ व २०१०-११ मध्ये).

व्यवस्थापनाने मान्य केले (मे,२०१२) की, आगाऊ कराच्या रकमेची परिगणना करतेवेळी त्यांना योग्यप्रकारे विक्री आणि खर्चाच्या रकमांची खात्यांत योग्य प्रकारे नोंदी करता आली नाही. व्यवस्थापनाने पुढे असेही सांगितले की कंपनीने कार्यचालन व व्यवस्थापन माहिती यंत्रणा बळकट करण्यासाठी

ईआरपी प्रणाली अंमलात आणण्याचे नियोजन करत होते. कंपनीच्या उत्तरास राज्य शासनानेही अनुमोदन (मे,२०१२) दिले होते. तरी सुद्धा वस्तुस्थिती राहतेच की कंपनीस आपल्या उत्पन्नाचा अचूक अंदाज घेण्यास अपयश आल्याने व्याजापोटी रु.७८.६७ लाख भरावे लागले.

**६.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, **या संदर्भातील स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आर्थिक वर्ष २००८-२००९ च्या प्रथम तिमाहीचा अंदाजे नफा व कर :—**आर्थिक वर्ष २००८-२००९ च्या सुरुवातीस वार्षिक उलाढाल ३९७.४८ कोटी व विभागीय स्तरावर रु.२१.४६ कोटी नफा अपेक्षित होता. या अंदाजित रु.२१.४६ कोटी नफ्यामधून मुख्य कार्यालय तसेच विभागीय कार्यालय स्वेच्छानिवृत्ती योजना, महागाई भत्ता, सेवा निवृत्ती वेतन या खर्चापोटी रु.२०.१४ कोटी वर्ग करता रु.१.३३ कोटी शिल्लक होती. (वरील शिल्लक घसारा, व्याज, कर वगळता आहे.) या अल्पशा रु.१.३३ कोटी नफ्यामध्ये घसाऱ्याची रक्कम रु.३.४५ कोटी तसेच व्यापारामध्ये होणारे नुकसान व खते विभागांची अपेक्षीत असलेली अस्थिर विक्री या सर्व कारणामुळे प्रथम तिमाहीसाठी आगावू कर भरणे संयुक्तीक वाटले नाही. यातच खतांची विक्री ही बहुतांशी हवामानावर अवलंबून असते व साधारणतः जुलैच्या सुरवातीस विक्रीबाबतचे अंदाज स्पष्ट होतात. यास्तव दुसऱ्या तिमाहीत (जुलै ते सप्टेंबर) खतांच्या विक्रीबाबतचे चित्र सप्ष्ट होते.

**आर्थिक वर्ष २०१०-२०११ :—**सन २०१०-२०११ यामध्ये रु.९५९.९० कोटीची उलाढाल अपेक्षित होती पण प्रत्यक्षात रु.९२१.२१ कोटींची उलाढाल झाली. त्यामुळे रु.४४.०० कोटीची तूट ही दिसून आली व खतांची अपेक्षित मागणी व पुरवठा यावरुनच अपेक्षित उलाढालीचा अंदाज बांधतात परंतु प्रथम तिमाहीत खतांची विक्री बहुतांशी ही खरीप हंगामातील हवामानावर अवलंबून असल्यामुळे विक्री अंदाज बांधणे दुरापास्त होते साधारणतः विक्री उलाढाल अंदाज हे चांगले खरीप व रब्बी हंगाम गृहित धरुन काढण्यात येतात या धर्तीवर रु.९५९.९० कोटीची अंदाजित उलाढाल गृहीत धरण्यात आली व त्यापोटी रु.५४.११ कोटी नफा काढण्यात आला. मुख्य कार्यालय व इतर सर्व वर्ग करता रु.२७.६१ कोटी कर पूर्व नफा दिसतो व या नफ्यावर १५% दराने प्रथम तिमाही आगावू कर रक्कम रु.१.४० कोटी होते. वरील सर्व परिस्थिती पहाता आगामी हंगामाचा होणारा परिणाम विचारात घेऊन अंदाजित रु.१.४० कोटी करापोटी रु.१.०० कोटी कराचा भरणा करण्यात आला.

**द्वितीय तिमाही II :**

**आर्थिक वर्ष २००८-२००९ :—**द्वितीय तिमाहीत विभागाने सुधारित अंदाज पत्रकात रु.४७९.७७ कोटी व रु.२३.३० कोटी अनुक्रमे उलाढाल व नफा दाखविला. रु.१९.७३ कोटी खर्चापोटी नफ्यात वर्ग करण्यात आले त्यामुळे कर पूर्व नफ्यात बदल दिसून आला. परंतु उत्तम हवामानामुळे खतांची मागणी वाढली व पर्यायाने विक्रीत व नफ्यात अनुक्रमे रु.८२.२९ कोटी व रु.१.८४ कोटी वाढ दिसून आली. त्यातच खर्चामध्ये रु.०.४० कोटीची कपात झाल्यामुळे कर पूर्व नफा रु.२.२४ कोटी दर्शविला गेला.

तसेच घसारा व व्यवसाय तोटा यापोटी रु.३.४५ कोटी रक्कम विचारात घेता अंदाजित नाममात्र नफा रु.३.५७ कोटी असल्याने द्वितीय तिमाहीत आगावू कर रक्कम भरणा करण्यात आला नाही.

**आर्थिक वर्ष २०१०-२०११ :—**सप्टेंबर महिना दरम्यान हवामान व विक्रीबाबतचे चित्र स्पष्ट झाले या दरम्यान अपेक्षित मागणी व पुरवठा यांचा वेग येऊ लागला. साधारणत: २०१०-२०११ मध्ये पाऊस थोडा उशीरा झाला या आर्थिक वर्षात उलाढाल व नफा यांचे अंदाजे अनुक्रमे रु.९२५.८९ कोटी व रु.५०.२५ कोटी निश्चित करण्यात आले. (गतवर्षी) च्या मानाने अनुक्रमे रु.३४.०० कोटी व रु.३.८६ कोटी कमी दर्शविण्यात आले. कृषी अभियांत्रीकी विभाग व पशुखाद्य विभाग यांच्या स्थितीमुळे अंदाज पत्रकात बदल करण्यात आला. या बदलामुळे अनुक्रमे रु.३० कोटी व रु.१० कोटी कृषी अभियांत्रीकी विभाग व पशुखाद्य विभागाची उलाढाल कमी करण्यात आली व त्याचा परिणाम कर पूर्व नफ्यात अनुक्रमे रु.३.५० कोटी व रु.३.८६ कोटी दर्शविला गेला व त्यापोटी लागणाऱ्या रु. ८.०७ कोटी करावर ४५% दराने रु.३.६३ कोटी द्वितीय आगावू कर दर्शविण्यात आला. व यापोटी रु.२ कोटी रक्कमेचा भरणा करण्यात आला (एकूण रु.३ कोटी)

**तृतीय III तिमाही**

**आर्थिक वर्ष २००८-२००९ ची उलाढाल**

**अंदाजित नफा व कर :—**मागील तिमाहीच्या अंदाजित उलाढाल रक्कम रु.४७९.८८ च्या पोटी सुधारित रु.५३०.४७ कोटींची उलाढाल गृहीत धरण्यात आली यामुळे रु.५०.७० कोटींची वाढ तृतीय तिमाहीत दिसते. त्याचप्रमाणे रु.७.६२ कोटींची नफ्यात वाढ दिसते. या परीवर्तनामुळे तसेच खर्चात रु.१.५८ कोटीची वाढ, महाराष्ट्र शासनाच्या ॲग्रो ॲडव्हानटेजच्या देय रकमेची तरतूद करण्यात आली.

कर भरणा गणना करतेवेळी सदर तरतूदेची संवैधानिक लेखापरीक्षकाच्या आग्रहामुळे नोंद करण्यात आली. रु. ३०.९२ कोटी अंदाजे नफा दिसतो. तृतीय तिमाहीत आगावू कर रक्कम भरणा करताना व्यावसायिक तोटा व घसारा यांचे एकत्रीत रु. २.४५ कोटी रक्कम वजा जाता रु. ७.१४ कोटी करोत्तर नफा दिसतो [ रु.९.६० (-) रु.२.४५ कोटी ] यास्तव ३१ डिसेंबर तृतीय तिमाही अखेरीस रु. १.८२ कोटी रक्कम देय दिसते.

कृषी अभियांत्रीकी विभागाचा शासनाच्या दर पत्रकामध्ये दर्शविलेल्या किंमतीत शासन निर्णयामुळे अपेक्षित उलाढालीत परिणाम होतो. परंतु काही अनिश्चित कारणांमुळे दर पत्रक तिमाहीत कार्यान्वित झाले नाही व त्यामुळे कृषी अभियांत्रीकी विभागाच्या उलाढालीत प्रतीकूल परीणाम झाला. त्यामुळे अपेक्षित असलेली उलाढाल व नफा यांच्यात घसरण झाली. व यास्तव अंदाजित कर देय रु. १.६३ कोटीच्या ऐवजी रु. १ कोटी भरणा करण्यात आला.

### आर्थिक वर्ष २०१०-२०११

तृतीय तिमाही दरम्यान अंदाजे उलाढाल व नफा यांची अनुक्रमे रु. ८८७.२६ कोटी आणि रु. ५१.६७ कोटी नोंद करण्यात आली (मागील तिमाहीत अनुक्रमे रु. ९२५.८९ कोटी व रु. ५०.२५ कोटी) कर पूर्व नफा रु. २५.१७ कोटींची गणना करण्यात आली व त्यातील कर रु. ८.३६ कोटी (मागील तिमाहीत रु.८.०७ कोटी) दर्शविला. ७५% प्रमाणे तृतीय आगावू कर भरणा रक्कम रु. ६.२७ कोटी होती व त्यापोटी रु.१.७७ कोटी रक्कम भरण्याविषयी प्रस्तावित करण्यात आले होते. (एकूण रु. ४.५० कोटी) कर निर्धारण वर्ष २००९-२०१० मध्ये रु. ५.०३ कोटी खर्चाची तरतूद उत्पन्नात मिळवण्यात आली, जी की कर निर्धारण वर्ष २०११-२०१२ मध्ये मंजूर करण्यात आली व त्या अनुषंगाने उर्वरित कराची भरपाई ही रु. ५.०३ कोटी खर्चामुळे होईल असे गृहीत धरुन रु. १.७७ कोटी भरणा करण्यात आला.

### चतुर्थ तिमाही :

### आर्थिक वर्ष २००८-२००९ अंदाजे नफा व कर

आर्थिक वर्ष २००८-०९ च्या चतुर्थ तिमाहीत मागील वर्षाच्या तृतीय तिमाही उलाढाल रक्कम रु. ५३०.४७ कोटींच्या तुलनेत रु.१८.१४ कोटीने वाढ झाली व एकूण उलाढाल रु. ५४८.६१ कोटी दर्शविली गेली. उलाढाल वाढीचे मुख्यत: कारण तृतीय तिमाहीत खताच्या विक्रीत झालेली लक्षणीय वाढं व त्यामुळे नफ्यामध्ये रु. ४.०५ कोटींची परिणामी वाढ झाली. त्यामध्ये खते विभागाची रु. ३.०४ कोटी वाढ समाविष्टीत होती व इतर विभागांनी ही रु. १.०१ कोटीची वाढ दर्शविली.

वरील सुधारित अंदाजामुळे कर पूर्व नफा रु.१७ कोटी झाला. (ढोबळ नफा रु.३५.०० कोटी अपेक्षित खर्च रु.१८.०० कोटी) चतुर्थ तिमाहीत असोशित घसारा व व्यावसायिक तोटा रु.१.९५ कोटी नक्त नफ्यातून वजा करता रु.१५.२४ कोटी नफा शिल्लक राहतो. व त्यावर रु.५.१८ कोटी कराची गणना होते. आगावू कर हप्ता रु.२.१० कोटी (रु.१.०० कोटी १५ डिसेंबर आणि रु.१.१० कोटी १५ मार्च २००८ रोजी) विचारात घेता कर रक्कम रु.३.०८ कोटी देय राहते.

त्याचबरोबर जानेवारी, २००६ ते जून, २००८ च्या दरम्यान महागाई भत्ता फरक देणेबाबत संचालक मंडळाकडे प्रस्ताव विचारधीन होता. महागाई भत्ता फरकापोटी रु.४.१३ कोटी, उपदाननिधी रु. १ कोटी, संशयास्पद ऋणकोसाठी तरतूद रक्कम रु.२.१३ कोटी, कर गणनेसाठी गृहीत धरली होती. या अपेक्षित असलेल्या तरतुदींमुळे चालू आर्थिक वर्षात कर देयता येत नसल्याचे चित्र समोर आले.

त्यातच महागाई भत्ता फरकापोटी असलेली देय रक्कम उपदाननिधी तसेच संशयास्पद ऋणको काढून टाकणेबाबतचा निर्णय संविधानिक लेखापरीक्षकांच्या सल्ल्याने मागे घेण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासनाला ॲग्रो ॲडव्हानटेजसाठी देय असलेल्या रक्कमेबाबतचा निर्णय लांबणीवर टाकण्यात आला.

या सर्व निर्णयाचा आर्थिक वर्षात कर स्थितीवर परीणाम झाला, पर्यायाने आगावू कर देयकावर झाला व त्यामुळे आर्थिक वर्ष २००८-२००९ मध्ये आगावू कर भरणा हफ्त्यात व त्या अनुषंगाने व्याजामध्ये रु.३८.५० लाख फरक पडला.

**आर्थिक वर्ष २०१०-२०११**

आर्थिक वर्ष २०१०-२०११ च्या चतुर्थ तिमाहीत उलाढाल व नफा अनुक्रमे रु.८७७.२१ व रु.५१.७३ कोटी अपेक्षित होता. मागील तृतीय तिमाहीच्या तुलनेत कोणताही मोठा फरक, उलाढाल व नफ्यात निर्देक्षित झाला नाही. कर पूर्व नफा रु. १५.२३ कोटी काढण्यात आला. महागाई भत्ता फरकाच्या पोटी रु.१०.०० कोटी कर पूर्व नफा कमी करण्यात आला. रु.१५.२३ कोटी कर पूर्व नफ्यापोटी रु.५.०५ कोटी (मागील तिमाहीत रु.८.३६ कोटी) गणना करण्यात आली. आगावू कर भरणा हफ्त्यापोटी रु.४.५० कोटी उर्वरित रु.०.६० कोटी रक्कम चतुर्थ तिमाहीत भरणा करण्याविषयी प्रस्तावित करण्यात आले.

अंतिम लेखे पूर्ण करतेवेळी एकूण उलाढालीत रु.४४.०० कोटींची वाढ नोंदविण्यात आली. सदर वाढ ही मार्च, २०११ च्या विक्रीमुळे दर्शविण्यात आली. एकट्या खते विभागाची उलाढाल

रु. ५२.५५ कोटीने बदलली त्यामुळे सर्व उलाढाल रु. ४४.०० कोटीने वाढली. या उलाढाल वाढीमुळे नफ्यात रु. १६.०९ कोटीची वाढ झाली की, जी चतुर्थ तिमाहीत अपेक्षित केल्यापेक्षा जास्त होती. ही वाढ मुख्यतः खते विभाग रु. ९.६८ कोटी, जंतूनाशके विभाग रु. २.९२ कोटी व कृषी अभियांत्रिकी विभाग रु. ३.५० कोटीमुळे नोंदविण्यात आली. पुष्कळदा संबंधित लेखा विभाग हा पणन विभाग तसेच खत कारखाने व वितरक यांनी दिलेल्या माहितीवर अवलंबून असतो. व त्यामुळे विक्री व खर्चाशी संबंधित बाबी या लेखांकन करण्यासाठी विलंब होतो. नजीकच्या भविष्यात अत्याधुनिक संगणकीय प्रणालीचा वापर करून कार्यपद्धतीत सुधारणा आणण्याविषयी महामंडळ विचार करत आहे.

आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये अपेक्षित रु.३ कोटी व्याजाच्या तुलनेत प्रत्यक्षात रु. ९.१५ कोटी व्याज प्राप्त झाले. यास्तव रु. ६.१५ कोटी वाढीमुळे करगणनेत वाढ झाली. व्याजापोटी वाढ ही मुख्यतः सरकारी अनुदान, महाराष्ट्र शासनाचा आगाऊ रक्कम व ठेवी यांचा परिणाम आहे. प्राप्त झालेल्या ठेवी महामंडळ अल्प कालावधीकरिता बँकेत ठेवते ज्याचा कालावधी अनियमित असतो. त्यामुळे व्यवस्थापनास हा निधी किती कालावधीसाठी राहील याबाबत अंदाज वर्तवता येत नाही. यास्तव आगाऊ कर भरणा रक्कम गणना करतेवेळी न्यूनतम कर प्राप्ती अपेक्षित धरण्यात आली. वरील सर्व कारणांमुळे आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये रु. ३८.८० लाख आगाऊ कर भरणा फरक व त्या अनुषंगाने व्याज आयकर गणनेत काढण्यात आले.

**६.३** याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**६.४** तद्नंतर याप्रकरणी समितीला कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक २० जानेवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ३.३ मध्ये " प्राप्तीकरावर टाळता येऊ शकणाऱ्या व्याजाचे देणे "** या आक्षेपासंदर्भात कृषी उद्योग विकास महामंडळाला विचारणा केली की, उद्योग करणाऱ्या सर्व कंपन्या जर ॲडव्हान्स टॅक्स भरत असतील तर कृषी उद्योग विकास महामंडळालाच का अडचण येते, देशामध्ये कोट्यावधी कंपन्या आहेत व त्या ॲडव्हान्स टॅक्स भरतात. त्यांचे अंदाजित प्रक्षेपण (ईस्टीमेटेड प्रोजेक्शन) असते तशा प्रकारे महामंडळाचे का नसते, तसेच आपल्या महामंडळाकडे अकाऊंटचे काम पाहणारे अधिकारी आहेत. महामंडळाने ॲडव्हान्स टॅक्स भरला व तो अधिक असेल तर तो परतही मिळतो. सदरहू चूक कोणामुळे झाली त्यास कोण जबाबदार आहेत याबाबत विचारणा केली.

यावर उत्तर देताना महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी सदरहू प्रकरणी सर्वांनाच अडचण आहे. महामंडळाचे पण अंदाजित प्रक्षेपण (इस्टीमेटेड प्रोजेक्शन) असते. सदर प्रकरणी प्रोजेक्शनची चूक झाली, असे म्हणता येईल. व्यवसायामध्ये एखादे वेळी अनपेक्षित लाभ होतो त्यामुळे किंमत कमी होते. दोन वर्षामध्ये जवळपास ७८ लाख रुपये महामंडळाकडून भरण्यात आले. सदरील वर्षात जवळपास १४०० कोटी रुपये उलाढाल होती. महामंडळाकडे नियमितपणे प्राप्तीकर भरण्यासाठी कर सल्लागार नाहीत. महामंडळाचे अधिकारी स्वत: जाऊन सदर प्रकरणी आयकर फाईल करतात असे समितीस सांगितले.

६.५ **अभिप्राय व शिफारस :—**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ३.३ प्राप्तीकरावर टाळता येऊ शकणाऱ्या व्याजाचे देणे (अंदाजित उत्पन्नावर आगाऊ कराचा भरणा करण्यात कसूर केल्याने प्राप्तीकराच्या रकमेवर व्याजाचे रु.७८.६७ लाख टाळता येण्याजोगे प्रदान करावे लागले) या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी प्राप्तीकर रक्कम भरणा करण्याचे काम बाह्य स्त्रोताद्वारे करता येऊ शकले असते महामंडळ व्यवसायिक पद्धतीने कारभार करु इच्छित असेल तर अशा वेळी कर सल्लागार (टॅक्स कन्सलटंट) नेमण्याची आवश्यकता होती. सदर काम करणारे लोक महामंडळात नसल्यामुळे ७८ लाख रुपये एवढी मोठी रक्कम महामंडळास भरावी लागली, असे समितीच्या निदर्शनास आले होते. त्यासाठी महामंडळाकडून कर सल्लागार (टॅक्स कन्सलटंट) नियुक्ती किंवा बाह्य स्त्रोताच्या (आऊट सोर्सिंगच्या) माध्यमातून करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत कारण हे महामंडळ नफा मिळवून देणारे शासनाचे एक महामंडळ आहे. दोन वर्षात महामंडळाने प्राप्तीकर भरणा करण्यात कसूर केल्याने जवळपास ७८ लाख रुपये नुकसान झाले आहे असे समितीचे मत झाले आहे.**

**तसेच अग्रिम करावर (ॲडव्हान्स टॅक्सवर) महामंडळास जवळपास ३१ लाख रुपये व्याजापोटी भरावे लागले. या रकमेच्या अर्ध्यापेक्षा कमी रकमेमध्ये प्राप्तीकर परतावा भरण्यासाठी महामंडळ, कर सल्लागार नियुक्त करु शकते. किंवा बाह्यस्त्रोताद्वारे कर सल्लागाराची नेमणूक करू शकते. आपल्या देशात हजारो कोटी रुपये उत्पन्न असलेल्या कंपन्या आहेत. त्या कंपन्या जर अग्रिम कर (ॲडव्हान्स टॅक्स) भरण्यासाठी योग्य अंदाजित प्रक्षेपण (इस्टीमेट प्रोजेक्शन) करु शकतात त्यामुळे महामंडळाने देखील जबाबदारीपूर्वक प्राप्तीकर परतावा भरण्याचे काम केले पाहिजे, असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## " महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित "

## (सन २०१०-२०११)

**सात-टाळता येण्याजोगे अतिरिक्त शुल्क :- (कंपनीचे अधिकृत भाग भांडवल वाढविण्यासाठी प्रबंधकांकडे सूचना दाखल केली नसल्यामुळे जुलै/ऑगस्ट,२०१० मध्ये रु.७५.०१ लाखाचे अतिरिक्त शुल्क भरावे लागले जे टाळता येण्याजोगे होते.)**

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-११ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.९ मध्ये " **टाळता येण्याजोगे अतिरिक्त शुल्क** " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र शासनाने (जीओएम) जुलै,१९७८ मध्ये रु. २.५० कोटी अधिकृत भाग भांडवलाने (एएससी), महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितची (कंपनी) स्थापना केली. जीओएम व केंद्र शासन यांच्याकडून कंपनीला भाग भांडवल (एससी) प्राप्त केले. कंपनीचे एएससी, मार्च, १९९६ पर्यंत रु. १०० कोटी आणि मार्च,२००४ पर्यंत रु. २०० कोटी असे वेळोवेळी वाढवण्यात आले. कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ९७ प्रमाणे कंपनीने आवश्यक शुल्क (वाढलेल्या एससीचे ०.०५ टक्के रक्कम) भरुन एएससीत केलेल्या वाढीची सूचना (फॉर्म ५) कंपनी प्रबंधकांकडे (आरओसी) ३० दिवसांच्या आत दाखल करणे बंधनीय आहे. फॉर्म ५ भरण्यास झालेल्या विलंबामुळे पहिल्या वर्षात शुल्का व्यतिरिक्त दरमहा दोन टक्के व त्यानंतर दरमहा २.५ टक्के असे अतिरिक्त शुल्क फॉर्म ५ दाखल करण्याच्या तारखेपर्यंत भरावे लागले.

वित्तीय वर्ष २००२-०३ च्या वार्षिक जमा खर्चाच्या लेखापरीक्षण दरम्यान आमच्या असे निदर्शनास आले (मार्च,२०११) की, कंपनीने रु. ११.९१ कोटीचे समभाग, २० सप्टेंबर,२००२ ला भारत सरकारला बहाल केले. रु. १०० कोटीचा एएससीच्या तुलनेत कंपनीचे भरणा झालेले भांडवल रु. १०३.१३ कोटी होते. एएससी रु. १०० कोटी पासून रु.२०० कोटी पर्यंत वाढविण्याचा जीओएमचा ठराव मार्च,२००४ म्हणजेच समभागांची वास्तविक वाटणी केल्याच्या १८ महिन्यानंतर संमत केला. जे अनियमित होते.

पुढे वरील तरतुदींचे अनुपालन करण्यास कंपनी अपयशी झाली आणि एएससी रु. २०० कोटी पर्यंत वाढविल्याची सूचना (फॉर्म ५) आरओसीकडे जुलै-ऑगस्ट,२०१० मध्ये कंपनी अधिनियम वाटाघाटी योजनेअंतर्गत दाखल केली. एएससी वाढविण्याकरिता रु. ९५ लाखाच्या नियमित नोंदणी

शुल्काच्या व्यतिरिक्त रु.७५.०१ लाख सूचना दाखल करण्यास झालेल्या विलंबामुळे, दंडात्मक शुल्क आरओसीकडे भरला (जुलै-ऑगस्ट, २०१०) कंपनीकडे सूचना दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण मार्गदर्शनासाठी तज्ञाचा अभाव हा होता. त्यामुळेच, कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींच्या उल्लंघनामुळे टाळता येण्याजोगे रु. ७५.०१ लाख खर्च करावा लागला. कंपनीच्या मेमोरेण्डम ऑफ असोशिएशनमध्ये एएससीत बदल केले नसून ते अद्यापही रु. १५ कोटी दाखवत आहे.

व्यवस्थापनाने नमूद केले (मे, २०११) की, कंपनी अधिनियमाच्या सर्व तरतुदींचे अनुपालन करण्यास कंपनी योग्य पाऊल उचलेल आणि आरओसीकडे विहित वेळेत सर्व आवश्यक बाबी दाखल करेल.

हे उत्तर असमर्थनीय आहे कारण की, कंपनीने विहित वेळेत आरओसीकडे फॉर्म ५ दाखल करायला हवा होता, जेणेकरून रु. ७५.०१ लाखाचे अतिरिक्त दंडात्मक शुल्क टाळता आले असते. तसेच २००५-०६ पासून कंपनीचे अंतिम लेखे अद्यापही तयार केलेले नाहीत.

ही बाब शासनाला कळविण्यात (एप्रिल, २०११) आली होती. त्यांचे उत्तर प्रलंबित होते. (नोव्हेंबर, २०११).

**७.२** याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. १०० कोटी वरुन २०० कोटी करण्यात आले आहे. सदर भाग भांडवलातील वाढीची नोंदणी (आरओसी) कंपनी प्रबंधकाकडे दिनांक ३१ ऑगस्ट २०१० रोजी करण्यात आली. त्यावेळी दिनांक १७ मार्च २००४ च्या शासन निर्णयानुसार महामंडळाचे भाग भांडवल रु. १०० कोटी वरुन रु. २०० कोटी झाले. सन २००४ ते २०१० या कालावधीमध्ये वरील विलंबाचे प्रमुख कारण म्हणजे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकाच्या सतत/ वरचेवर पदावरील नेमणुका झाल्याने दिनांक ३१ मार्च २००४ ते ३१ मार्च २०१० दरम्यान २० वेळा व्यवस्थापकीय संचालक बदलण्यात आले आहेत. त्यातही ९ वेळा त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. रजिस्ट्रार ऑफ कंपनीज मध्ये मुद्रांक शुल्क भरण्याकरिता त्या त्या वर्षाचे लेखे पूर्ण असणे आवश्यक असते. सदर कालावधीचे लेखे प्रलंबित राहिले याबाबतची स्पष्टीकरणात्मक वर्षनिहाय टिप्पणी सोबत जोडली आहे.

सदर कालावधीमध्ये वार्षिक लेखे अपूर्ण असल्याने कंपनी प्रबंधकांकडे मुद्रांक शुल्क भरता आलेले नाही. अशा परिस्थितीत जेव्हा दिनांक २६ मे २०१० रोजी Company law and settlement scheme circular No. १/२०१० ची घोषणा झाल्यावर महामंडळास एकूण रु. ३,००,०३,९९४ (रुपये तीन कोटी तीन हजार नऊशे चौऱ्याण्णव मात्र) इतके मुद्रांक शुल्क अतिरिक्त शुल्कासहित भरणे आवश्यक होते. परंतु तत्परतेने महामंडळाने सदर योजनेचा लाभ घेऊन रु.७५,०१,००० (रुपये पंच्याहत्तर लाख एक हजार मात्र) रक्कम दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० मध्ये वाढीव भाग भांडवलाची नोंदणी करून रुपये २,२५,०२,९९४ एवढे शुल्क वाचविले आहे. सन २०११-१२ व २०१२-१३ पर्यंतचे महामंडळाचे लेखे मार्च, २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानमंडळाच्या पटलावरती सादर करण्यांत आले आहेत. सन २०१३-१४ या कालावधीचे लेख्यांचे सांविधानिक लेखापालांकडून लेखापरिक्षण पूर्ण झालेले असून महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात येतील. तसेच २०१४-१५ वर्षाचे लेखापरिक्षण सनदी लेखापाल मे. रामानंद ॲन्ड असोसिएटस, मुंबई यांच्याकडून सुरू आहे.

महामंडळाच्या Memorandum of association मध्ये भाग भांडवलामध्ये रु. १५ कोटी दाखविले आहे. त्यानंतर वेळोवेळी वाढविण्यांत आलेले भागभांडवल संचालक मंडळाने मान्य केलेले असून रु.२०० कोटी वरून रु. ५०० कोटी बाबतची विशेष सर्व साधारण सभा फेब्रुवारी,२०१६ अखेर ठेवण्यांत येत आहे. नियमाप्रमाणे Memorandum of association मध्ये वाढीव (रु.५०० कोटी) भाग भांडवलाच्या नोंदी विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मान्यतेनंतर करता येतील.

७.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. १०० कोटी वरून रु. २०० कोटी केल्याची नोंदणी (आरओसी) कंपनी प्रबंधकाकडे करण्यास विलंब झाल्याबाबत महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे. सूचना दिल्याप्रमाणे सन २०१२-१३ पर्यंतचे लेखे विधानमंडळ पटलावर ठेवून अधिवेशनात सहमत करून घेतलेले आहेत. त्याचप्रमाणे महामंडळाच्या संस्थापन नियमावलीमध्ये रु. १५ कोटी अधिकृत भाग भांडवलाऐवजी रु. ५०० कोटी अधिकृत भाग भांडवल असे अद्ययावत करण्याबाबत महामंडळाला शासन स्तरावरून सूचना देण्यात येत आहेत.

७.४ तद्नंतर याप्रकरणी समितीला सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, तसेच महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ

मर्यादितचे महाव्यवस्थापक व इतर अधिकारी यांची दिनांक २ फेब्रुवारी २०१६ व १७ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.९ मध्ये " टाळता येण्याजोगे अतिरिक्त शुल्क " कंपनीचे अधिकृत भाग भांडवल वाढविण्यासाठी प्रबंधकांकडे सूचना दाखल केली नसल्यामुळे जुलै/ऑगस्ट,२०१० मध्ये रु. ७५.०१ लाखाचे अतिरिक्त शुल्क भरावे लागले जे टाळता येण्याजोगे होते. त्यानुषंगाने महामंडळाला ७५ लाखाचा दंडात्मक शुल्क रजिस्टर ऑफ कंपनीकडे (आरओसी) भरावा लागला आहे. त्यासंदर्भात ज्या जबाबदार व्यक्ती होत्या त्यासंदर्भातील माहिती विषद करावी असे समितीने सांगितले.

त्यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, सन २००० मध्ये आढावा घेण्यात आला होता. सन १९९८ ते २००० या कालावधीमधील विलंबाचे प्रमुख कारण म्हणजे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामध्ये उपरोक्त कालावधी दरम्यान २० वेळा व्यवस्थापकीय संचालक बदलण्यात आले. त्यातही त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. काही व्यवस्थापकीय संचालक तर अवघे १५-१५ दिवसासाठी कार्यरत होते. यामध्ये जबाबदार व्यक्तींच्या नावाची यादी समितीला सादर केली जाईल. माझ्या मते त्यामुळे निर्णय घेण्यामध्ये उशिर झाला या मुद्याशी विभाग सहमत आहे. तद्नुसार समितीने विचारणा केली की, याबाबतची माहिती कंपनी प्रबंधकाकडे (आरओसी) पाठवली गेली नव्हती तसेच यामध्ये आधीच ७५ लक्ष रुपयांचे नुकसान झालेले असताना आता सुद्धा या विषयाकडे दुर्लक्ष होत आहे या विषयाच्या संदर्भात आताही तसाच दर्जा आहे काय, यासंदर्भातील माहिती विषद करण्यात यावी अशी समितीने साक्षीच्यावेळी विचारणा केली.

त्यासंदर्भात महामंडळाच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, कंपनी प्रबंधकाकडे मुद्रांक शुल्क भरण्याकरिता त्या त्या वर्षाचे लेखे पूर्ण असणे आवश्यक होते सदर कालावधीमध्ये वार्षिक लेखे अपूर्ण असल्याने कंपनी प्रबंधकाकडे (आरओसी) मुद्राक शुल्क भरता आले नाही. तसेच सन २००६ पासून ते आतापर्यंत या महामंडळावर जेवढे संचालक होते त्या सर्वांचे डिन नंबर लागतील अशी विचारणा कंपनी प्रबंधकाकडे केली आहे. आपल्या राज्यातील जेवढे संचालक होते त्यांचे नंबर्स आम्हाला मिळाले आहेत. परंतु दिल्लीवरून विभागाला दोन तीन संचालकाचे नंबर मिळण्यात उशिर होत आहे. प्रत्येक वर्षी जेवढे संचालक होते त्या सर्वांचे डिन नंबर विभागाला लागणार आहेत. त्यावर समितीने विचारणा केली की, विभागाने संचालकांचे डिन नंबर काढले होते काय.

त्यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, संगणकीकरण झाल्यामुळे डिन नंबर टाकला नाही तर पुढील माहिती येत नाही. डिन नंबर सापडले नाही तर ते निर्माण करावे लागतील. यासंदर्भात विभाग निश्चितपणे तोडगा काढणार आहे. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामध्ये जेवढे संचालक होते त्यापैकी ९० टक्के संचालकांचे डिन नंबर मिळाले असून १० टक्के माहिती मिळवण्यात अडचणी येत आहेत. परंतु ते सुद्धा विभागाद्वारे क्लिअर करणार आहोत. यासंदर्भात १० टक्के माहिती मिळविण्याबाबत महामंडळाने अर्ज केला आहे काय, या समितीच्या प्रश्नावर विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले की, यासंदर्भात विभागाने अर्ज केला असून तो प्रक्रियेमध्ये आहे.

७.५ **अभिप्राय व शिफारस :—**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ३.९ टाळता येण्याजोगे अतिरिक्त शुल्क (कंपनीचे अधिकृत भाग भांडवल वाढविण्यासाठी प्रबंधकांकडे सूचना दाखल केली नसल्यामुळे जुलै/ऑगस्ट, २०१० मध्ये रु.७५.०१ लाखाचे अतिरिक्त शुल्क भरावे लागले जे टाळता येण्याजोगे होते)** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ९७ नुसार **महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने कंपनी प्रबंधकाकडे (आरओसी) अधिकृत भाग भांडवलामध्ये केलेल्या वाढीची सूचना म्हणजेच फॉर्म ५, तीस दिवसांच्या आत दाखल करायला हवा होता व तत्पूर्वी लेखे पूर्ण करणे आवश्यक होते, त्यामुळे फॉर्म ५ दाखल करण्यास विलंब झाल्याने रुपये ७५.०१ लाखाचे अतिरिक्त दंडात्मक शुल्क आकारण्यात** आले यावरून असे दिसून येते की, विहित कालावधीत **लेखे पूर्ण केले नसल्यामुळे ३० दिवसांच्या आत फॉर्म ५ कंपनी प्रबंधकाकडे (आरओसी) दाखल न करणाऱ्या तत्कालिन व्यवस्थापकीय संचालकांविरुद्ध व संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

**तसेच सन २००५-२००६ पासून कंपनीचे अंतिम लेखे अपूर्ण असून ऑनलाईन सिस्टीमद्वारे एकाही संचालकाच्या डिन नंबरची नोंद घेण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे, त्यामुळे ही बाब अत्यंत गंभीर असुन समितीचे स्पष्ट मत आहे की, महामंडळाने अद्ययावत संगणक प्रणाली अवगत करून घ्यावी किंवा बाह्यस्त्रोताद्वारे प्रलंबित असणारे अंतिम लेखे त्वरीत पूर्ण करावेत व याची संपूर्ण जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांवर सोपविण्यात यावी. त्यादृष्टीने शासनाने कायमस्वरुपी व्यवस्थापकीय संचालक नेमणे गरजेचे आहे त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा, अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

# बैठकींचे परिशिष्ट

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी दुपारी २.०० वाजता, कक्ष क्रमांक १९०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

३. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

४. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

५. श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव,

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

(४) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

(५) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

(१) श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार. पीएजी-III,मुंबई

(२) श्री. खेडकर, वरिष्ठ लेखा परिक्षक, पीएजी-III,मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. प्र. ग. गणवीर, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) श्री. सु. मो. रामचंदानी, सह व्यवस्थापकीय संचालक, एमएसआरडीसी

(३) श्री. श्री. स. जोशी, मुख्य अभियंता, एमएसआरडीसी शिबीर कार्यालय, औरंगाबाद

(४) श्री. बा. ना. ओहोळ, मुख्य अभियंता, एमएसआरडीसी

(५) श्री. दिलीप आ. साळुंके, मुख्य अभियंता, एमएसआरडीसी

(६) श्री. अरुण पुं. विधळे, सह व्यवस्थापकीय संचालक-२, एमएसआरडीसी

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

उपस्थिती

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

३. श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.

४. श्री. राजन साळवी, वि.स.स.

५. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

६. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

७. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

८. ॲड. अनिल परब, वि.प.स.

९. आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.

१०. श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. राजेश तारवी, उप सचिव

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

(१) श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार,पीएजी-III, मुंबई

(२) श्री. खेडकर, वरिष्ठ लेखा परिक्षक, पीएजी-III, मुंबई.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. स. भा. तामसेकर, सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) श्री. राधेश्याम मोपलवार, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी दुपारी २-०० वाजता, कक्ष क्रमांक १९०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते:-

## उपस्थिती

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

३. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

४. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

५. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

६. ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

७. श्री. भारत भालके, वि.स.स.

८. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

९. श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.(लेखा)

(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

(१) श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार,पीएजी-III, मुंबई

(२) श्री. खेडकर, वरिष्ठ लेखापरीक्षक, पीएजी-III, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. डी. के. जैन, अपर मुख्य सचिव, कृषी विभाग,

(२) श्री. अरविंद कुमार, व्यवस्थापकीय संचालक, एमएआयडीसी, मुंबई,

(३) श्री. मिलींद आकरे, कार्यकारी संचालक, म.रा.कृषी पणन मंडळ,

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० व २०११-२०१२ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

## उपस्थिती

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

३. श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

४. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

५. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

६. श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.

७. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

८. ॲड.यशोमती ठाकूर, वि.स.स.

९. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

१०. श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

११. श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार, पीएजी-III, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. अरविंद कुमार, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, मर्यादित.

(२) श्री. मिलींद आकरे, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ च्या वाणिज्यिक अहवालातील "महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार,दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-**

**उपस्थिती**

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

३. श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

४. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

५. आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.

६. श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

(१) श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार,पीएजी-III, मुंबई

(२) श्री.खेडकर, वरिष्ठ लेखा परीक्षक, पीएजी-III, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग,

(२) श्री. राकेश बेद, महाव्यवस्थापक, म.फु.मा.वि.म.,

(३) श्री. जा.मा. गोसावी, सह सचिव, सामाजिक न्याय विभाग.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या वाणिज्यिक अहवालातील "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित" यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

**उपस्थिती**

१. डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

३. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

४. डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

५. ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.

६. श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.

७. श्री. अमित साटम, वि.स.स.

८. श्री. राजन साळवी, वि.स.स.

९. श्री. सुनिल राऊत, वि.स.स.

१०. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

११. श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,

(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई